
सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २७ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात

### रेबीजमुळे चिमुकल्या समर्थ स्वामीचा दुर्दैवी मृत्यू



**सोलापूर :** भवानी पेठ परिसरातील घोंगडे वस्ती येथे कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या समर्थ स्वामी या चिमुकल्याचा उपचारादरम्यान रेबीजमुळे पहाटे दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संबंधित कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबरोबरच घटनेची चौकशी व भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.घटनेनंतर स्थानिक नगरसेवक राजकुमार पाटील यांनी मृत बालकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच पीडित कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी यासाठी पालकमंत्री, महापालिका प्रशासन तसेच आमदार देशमुख यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### आश्रमशाळेतील 40 विद्यार्थ्यांना जेवणानंतर अन्नातून विषबाधा

**अमरावती :** अमरावतीच्या मेळघाट परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. रात्रीचे जेवण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या मेळघाट दौऱ्यावर असतानाच ही घटना घडल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली. टीटंबा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत सुमारे ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गुरुवारी (२५ जुलै) रात्रीचे जेवण झाल्यानंतर काही वेळातच ३० ते ४० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ आणि पोटदुखीचा त्रास जाणवू लागला. विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याचे लक्षात येताच आश्रमशाळा प्रशासनाने तातडीने त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात हलवले. सध्या सर्व विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांचे लक्ष आहे.

### तस्करांनी आणलेले 27 किलो सोने जप्त, 12 जणांना अटक

**नवी दिल्ली :** सोन्याची तस्करी करणाऱ्या संघटित टोळ्यांच्या जाळ्याविरोधातील आपली मोहीम तीव्र करत, महसूल गुप्तचर संचालनालयाने (DRI) देशभरात गुप्त माहितीच्या आधारे अनेक कारवाया केल्या आहेत. यामध्ये विदेशी बनावटीचे तस्करी करून आणलेले 27 किलोपेक्षा जास्त सोने जप्त करण्यात आले असून 12 जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवायांदरम्यान विमानातील शौचकूप, वाहने व भांड्यांमध्ये बनवलेले विशेष कप्पे आणि शरीरात सोने लपवण्यासारख्या अत्याधुनिक पद्धती उघडकीस आल्या आहेत. गुप्त माहितीच्या आधारे, डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी 23-24 जुलै रोजी अदीस अबाबा येथून आलेल्या 3 प्रवाशांना रोखले. विमानाची कसून तपासणी केली असता, मागच्या टॉयलेटच्या छताच्या पॅनेलमध्ये लपवलेल्या सुमारे 12 किलो वजनाच्या विदेशी सोन्याच्या 6 लगडी सापडल्या. विमानतळ कर्मचाऱ्यांमार्फत हे सोने नंतर बाहेर काढले जाणार होते, असे चौकशीत आढळले. सोने जप्त करून तिन्ही प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.23.07.2026 रोजी मिळालेल्या माहितीनुसार, डीआरआय अधिकाऱ्यांनी ब्रह्मपुत्रा मेलने प्रवास करणाऱ्या एका महिला प्रवाशाला उत्तर प्रदेशात पकडले.

# सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर-स्वावलंबी भारताच्या उभारणीचा निर्धार दृढ करूया : पंतप्रधान



**नवी दिल्ली :** आज संरक्षण उत्पादन असो, संरक्षण निर्यात असो किंवा मित्र देशांसोबतचं राजकीय सहकार्य असो, भारत सातत्यानं नवी उंची गाठत आहे. नुकत्याच झालेल्या इंडोनेशिया दौऱ्यात ब्राह्मोस आणि अस्त्र क्षेपणास्त्रांसाठी एक मोठा करार झाला आहे. भारताची संरक्षण उपकरणं आणि तंत्रज्ञानावरील जगाचा विश्वास वाढत आहे. आजच्या 'कारगिल विजय दिवसा'निमित्त सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर-स्वावलंबी भारताच्या उभारणीचा आपला निर्धार अधिक दृढ करूया, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. 'मन की बात'च्या 136 व्या भागातून त्यांनी देशवासियांशी संवाद साधला.

मोदी पुढे म्हणाले, आजचा भारत आपल्या वीरांचं केवळ स्मरणच करत नाही, तर त्यांच्या शौर्यगाथाही नव्या पिढीपर्यंत पोहोचवत आहे. याच भावनेतून यंदा विशेष 'शौर्य विजय यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. 14 जुलै रोजी दिल्लीच्या 'नॅशनल वॉर मेमोरियल' या राष्ट्रीय युद्ध स्मारकावरून सुरू झालेली ही दुचाकी फेरी, द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकापर्यंत पोहोचेल. 'वन राइड, वन नेशन, वन सॅल्यूट' - एक यात्रा, एक राष्ट्र, एक सलाम हा या यात्रेचा संदेश आहे. राष्ट्रासाठी दिलेलं बलिदान कधीही विसरता येत नाही, याची जाणीव ही यात्रा आपल्याला करून देते. आज भारत आपल्या सैनिकांच्या शौर्याबरोबरच स्वतःची तांत्रिक क्षमता देखील सातत्यानं बळकट करत आहे. काही दिवसांपूर्वीच भारतीय नौदलाच्या ताफ्यात 'आयएनएस महेंद्रगिरी' ही युद्धनौका समाविष्ट करण्यात आली. या आधुनिक युद्धनौकेची रचना भारतातच केली गेली आहे आणि उभारणीही भारतातच झाली आहे. यात 75 टक्क्यांहून अधिक स्वदेशी साहित्याचा वापर झाला आहे. हे 'आत्मनिर्भर भारत'च्या वाढत्या शक्तीचं प्रतीक आहे. याच महिन्यात डीआरडीओ या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं, 'पिनाका लाँग रेंज गायडेड रॉकेट', या दीर्घ पल्ल्याच्या मार्गदर्शित क्षेपणास्त्र प्रक्षेपकाची यशस्वी चाचणी केली. या यशामागे आपल्या शास्त्रज्ञांचे आणि अभियंत्यांचे सामूहिक परिश्रम आहेत.

# पीओके भारताचा अविभाज्य भाग : राजनाथ सिंह

## पाकिस्तानसोबत फक्त याच मुद्यावर चर्चा

**कारगिल :** भारत पाकिस्तानसोबत केवळ पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीर (पीओके) या मुद्द्यावरच चर्चा करेल असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी सांगितले. सिंह यांनी द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकावर कारगिल विजय दिवस समारंभाच्या संबोधनात ही घोषणा केली. संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, शेजारी देशासोबत भविष्यात होणारी कोणतीही चर्चा केवळ पीओकेच्या मुद्द्यावरच असेल. पीओके हा भारताचा अविभाज्य भाग आहे.

ते म्हणाले की, पाकिस्तानने आपल्या राज्य धोरणाचा एक भाग म्हणून दहशतवादाला संस्थात्मक स्वरूप दिले आहे आणि तेथील लष्करी आस्थापना व दहशतवादी संघटनांमध्ये कोणताही फरक नाही. सिंह यांनी सांगितले की, भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांना कडक प्रत्युत्तर दिले आहे. भारत कोणत्याही शत्रुत्वपूर्ण कारवाईला आणखी अधिक ताकदीने प्रत्युत्तर देण्याची क्षमता ठेवतो, असा संदेश देण्यात आला आहे.

# गेल्या 12 वर्षांत आठ घटना दुरुस्त्या, सरकारची संसदेत माहिती

**नवी दिल्ली :** गेल्या बारा वर्षांत भारताच्या राज्यघटनेत आठ वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात ही दिली. अधिनियमित करण्यात आलेल्या संबंधित घटनादुरुस्ती विधेयकांचा तपशील पुढीलप्रमाणे : १. भारताच्या राज्यघटनेची (९९ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१४ (सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी विद्यमान कोलेजियम प्रणालीच्या जागी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग स्थापन करण्यासंबंधी. २. भारताच्या राज्यघटनेची (१०० वी दुरुस्ती) अधिनियम, २०१५ (भारत आणि बांगलादेश यांच्यातील भू-सीमा कराराशी संबंधित. ३. भारताच्या राज्यघटनेची (१०१ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१६ (देशातील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी ) शी संबंधित). ४. भारताच्या राज्यघटनेची (१०२ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१८ (राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा प्रदान करण्यास संबंधित). ५. भारताच्या राज्यघटनेची (१०३ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१९ (सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षणाशी संबंधित).



६. भारताच्या राज्यघटनेची (१०४ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१९ (लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी जागांचे आरक्षण आणखी दहा वर्षांसाठी, म्हणजेच २५ जानेवारी, २०३० पर्यंत वाढविण्यास संबंधित). ७. भारताच्या राज्यघटनेची (१०५ वी दुरुस्ती) अधिनियम, २०२१ (राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४२A मध्ये दुरुस्ती तसेच त्यानुषंगाने राज्यघटनेच्या अनुच्छेद ३३८B आणि ३६६ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्त्यांशी संबंधित). ८. भारतीय राज्यघटनेची (१०६ वी दुरुस्ती) अधिनियम, २०२३ (लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी जागांचे आरक्षण करण्यास संबंधित).

# 'शिवसेना जनतेच्या दारी' अभियान राज्यभर राबवणार : एकनाथ शिंदे

**मुंबई:** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विकास, जनसेवा आणि युवा सक्षमीकरण या तीन मुद्द्यांवर भर देत 'शिवसेना जनतेच्या दारी – एक पाऊल ध्येयपूर्तीकडे' हे अभियान राज्यभर राबविण्याची घोषणा केली. मुंबईतील नेस्को एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शासनाच्या योजना शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवणे हेच सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शिंदे म्हणाले की, 'शासन आपल्या दारी' उपक्रमानंतर आता 'शिवसेना जनतेच्या दारी' अभियानाद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवला जाणार आहे. या उपक्रमातून एका दिवसात 20 हजारांहून अधिक नागरिकांना ज्येष्ठ नागरिक कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड तसेच विविध शासकीय दाखल्यांचे वितरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

युवकांशी संवाद साधताना त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), स्टार्टअप, इनोव्हेशन आणि ग्रीन टेक्नॉलॉजीसारख्या क्षेत्रांमध्ये पुढाकार घेण्याचे आवाहन केले. नवीन संधींचा लाभ घेत स्वतःच्या कौशल्याचा विकास करण्यावर त्यांनी भर दिला.

2022 नंतरच्या राजकीय घडामोडींचा उल्लेख करत शिंदे म्हणाले की, सरकारचा भर सत्तेवर नसून विकासकामांवर आहे. शेतकरी, महिला, युवक, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध निर्णय घेतले जात असून जनतेची सेवा हेच सरकारचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शिवसैनिकांनी गावागावात जाऊन नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दापोली येथील मीनाताई ठाकरे नाट्यगृहासाठी 15 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची घोषणा शिंदे यांनी केली. त्यासंदर्भातील शासन निर्णयही त्यांनी कार्यक्रमात सुपूर्द केला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना सचिव सिद्धेश कदम यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचेही शिंदे यांनी कौतुक केले. एका दिवसात हजारो नागरिकांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्याबरोबरच 250 गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी राज्यभर 'शिवसेना जनतेच्या दारी' अभियान राबविण्याबरोबरच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत 450 कोटी रुपयांच्या स्वच्छता यंत्रसामग्री उपक्रमाची आणि गड-किल्ल्यांच्या संवर्धनाची घोषणाही करण्यात आली.

या कार्यक्रमाला रामदास कदम, गजानन कीर्तिकर, सिद्धेश कदम, शीतल म्हात्रे, सचिन अहिर, रवींद्र वायकर, मनीषा कायंदे, प्रकाश सुर्वे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# भारताने एफआयएच युथ हॉकी फाईव्ह्स आशियाई चॅम्पियनशिप जिंकली




**मस्कत :** भारताच्या सब-ज्युनियर पुरुष संघाने पाकिस्तानला ३-१ ने पराभूत करत एफआयएच युथ हॉकी फाईव्ह्स आशियाई चॅम्पियनशिप जिंकली. अंतिम सामन्यात भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ३-१ ने हरवले. रोमित पाल (५ व्या मिनिटाला), कर्णधार केतन कुशवाहा (१२ व्या मिनिटाला) आणि शाहरुख अली (१३ व्या मिनिटाला) यांच्या गोलांनी भारताचे आशियाई विजेतेपद निश्चित केले. या विजयामुळे भारतीय पुरुष संघ एलिट पूलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे.

अचूक पासिंग आणि शिस्तबद्ध रणनीतीच्या जोरावर भारताने अंतिम सामन्यात सुरुवातीलाच आघाडी घेतली. पहिल्या हाफमध्ये रोमित पालने पाकिस्तानी गोलरक्षकाला चकवून पहिला गोल केला, ज्यामुळे मध्यंतरापर्यंत भारताला १-० अशी आघाडी मिळाली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला कर्णधार केतन कुशवाहाने (१२ व्या मिनिटाला) आणखी एक गोल करून भारताला मजबूत स्थितीत आणले. त्यानंतर लगेचच शाहरुख अलीने आणखी एक गोल करून ३-० अशी आघाडी मिळवून दिली. मोहम्मद उस्मानने १६ व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे पाकिस्तानने पिछाडी कमी केली, परंतु भारतीय बचावफळीने शेवटच्या मिनिटांमध्ये भक्कम बचाव करत पुढील गोल होऊ दिले नाहीत.


अंतिम फेरीत पोहोचल्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी एफआयएच युथ हॉकी फाईव्ह्स विश्वचषकासाठी आधीच पात्रता मिळवली आहे. महिलांच्या गटात, भारतीय संघाला विजेतेपद गमवावे लागले आणि त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्यात भारताला चीनकडून २-४ असा पराभव पत्करावा लागला.




# सारनाथ या प्राचीन बौद्ध स्थळाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश, पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला आनंद

**नवी दिल्ली :** दक्षिण कोरियातील बुसान येथे सुरू असलेल्या 'जागतिक वारसा समिती'च्या 48 व्या बैठकीत, भारताने 2025-26 या वर्षाकरिता वारसा यादीत समावेशसाठी अधिकृतपणे नामांकन केलेल्या 'सारनाथ येथील प्राचीन बौद्ध स्थळाचा' युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून वारसास्थळ म्हणून मान्यता मिळालेले हे भारतातील 45 वे ठिकाण ठरले आहे. हा जागतिक सन्मान, भारताच्या चिरंतन सांस्कृतिक वारशाचा गौरव असून वास्तुशिल्पातील नैपुण्य, प्रादेशिक ओळख आणि ऐतिहासिक सातत्य यांसारख्या विविध परंपरा त्यातून अधोरेखित झाल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्यासह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही



या ऐतिहासिकदृष्ट्या उल्लेखनीय निर्णयाचे स्वागत केले असून या उपलब्धीबद्दल भारतीय जनतेचे अभिनंदन केले आहे.

**सारनाथ येथील प्राचीन बौद्ध स्थळ**

उत्तर प्रदेशातील वाराणसी परिसरात असलेल्या आणि जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट झालेल्या या 'स्थळमालिके'त दोन मुख्य घटकांचा समावेश आहे. चौखंडी स्तूप आणि सारनाथचे पुरातत्वीय अवशेष (यामध्ये धमेख स्तूप, धर्मराजिका स्तूप, मूलगंधकुटी विहार, अशोक स्तंभ इत्यादींचा समावेश आहे). बौद्ध परंपरेत ऋषिपत्तन, इशिपत्तन, मृगदाव अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या सारनाथ या स्थळी स्थापत्यकलाविषक आणि पुरातत्वीय अवशेष अशा दोन घटकांच्या रुपात प्राचीन अवशेषांचे जतन करण्यात आले आहे. या सर्व नावांवरून त्याचा पवित्र क्षेत्र म्हणून असलेला संदर्भ प्रस्थापित होतो, या स्थळाला भगवान बुद्धांनी इसवी सन पूर्व सहाव्या शतकात भेट दिली होती तसेच 'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणून ओळखले जाणारे त्यांचे पहिले प्रवचनही त्यांनी याच ठिकाणी झाले होते. हीच घटना बौद्ध संघाचा आरंभ करणारी ठरून 'आर्य अष्टांगिक मार्गा'च्या तत्त्वांची स्थापना झाली होती.

स्वतः बुद्धांनी चार प्रमुख बौद्ध तीर्थस्थळांपैकी एक म्हणून सूचित केलेले सारनाथ हे ठिकाण राजघराणी, मठ आणि

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## बनावट इसार पावतीद्वारे पतसंस्थेची 45 लाखांची फसवणूक परळीत चौघांवर गुन्हा दाखल

**बीड, 26 जुलै :** जुनी तारण असलेली मालमत्ता पुन्हा तारण दाखवून माहेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेची सुमारे ४५ लाख ४ हजार ६५० रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश रामप्रसाद झंवर (वय ५९, रा. मोंढा परळी) यांच्या तक्रारीवरून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संशयित आरोपी नकुल नंदकिशोर जोशी यांनी २०१९ मध्ये वडील नंदकिशोर जगन्नाथ जोशी यांच्या मालकीच्या घराची इसार पावती देऊन पतसंस्थेकडून टप्प्याटप्प्याने कर्ज घेतले होते. त्यानंतर २०२१ मध्ये नकुल जोशी यांनी २५ लाख रुपयांचे कर्ज घेतले. या कर्जासाठी नकुल यांची पत्नी भाग्यश्री नकुल जोशी आणि आई वालीबाई नंदकिशोर जोशी (सर्व रा. परळी वै.) या जामीनदार राहिल्या. कर्ज घेतल्यानंतर काही दिवस व्याज भरल्यानंतर आरोपींनी हप्ते भरणे बंद केले. वसुली अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता त्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर पतसंस्थेने चौकशी केली असता, तारण दिलेली मालमत्ता २०१७ मध्येच दुसऱ्या क्रेडिट सोसायटीकडे गहाण ठेवलेली असल्याचे निष्पन्न झाले. जुने तारण लपवून बनावट इसार पावतीद्वारे पतसंस्थेची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ५०४, ५०६ आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## बीड पोलिस जमिनीचे आणि कौटुंबिक वाद गंभीर गुन्ह्यांत रूपांतरित होण्यापूर्वीच रोखणार

**बीड, 26 जुलै :** बीड जिल्हा पोलीस दलाने जमिनीचे आणि कौटुंबिक वाद गंभीर गुन्ह्यांत रूपांतरित होण्यापूर्वीच रोखण्यासाठी 'पोलीस आपल्या बांधावर', 'भरोसा सेल' आणि 'सुगम संपर्क अभियान' या तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत पोलीस थेट नागरिकांच्या बांधावर आणि घरापर्यंत पोहोचून वादांवर संवादाच्या माध्यमातून तोडगा काढणार आहेत, जेणेकरून जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहील.

बीड पोलिसांनी नुकत्याच केलेल्या गुन्ह्यांच्या मूळ कारण विश्लेषणात एक धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्ह्यात घडलेल्या एकूण गंभीर गुन्ह्यांपैकी सुमारे २६ टक्के गुन्हे हे जमीन, शेत, बांध आणि पाणी यांसारख्या शेतीविषयक वादांतून घडले आहेत. याशिवाय, तब्बल १६ टक्के गुन्हे हे कौटुंबिक आणि वैवाहिक मतभेदांमधून निर्माण झाले आहेत. अनेकदा हे छोटे वाद वेळीच न सोडवल्याने त्याचे रूपांतर मारहाण किंवा खुनाच्या प्रयत्नांसारख्या गंभीर घटनांमध्ये होते. या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीड पोलिसांनी 'पोलीस आपल्या बांधावर' ही योजना सुरू केली आहे. यामध्ये पोलीस अधिकारी थेट शेतात जाऊन महसूल विभागाच्या मदतीने वाद शांततेने सोडविण्याचा प्रयत्न करतील. तसेच, पती-पत्नी किंवा घरातील इतर सदस्यांमधील तणाव कमी करण्यासाठी 'बीड भरोसा सेल'मार्फत समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून नागरिकांना या सेवेशी थेट संपर्क साधता येईल.

## 800 बाल वारकऱ्यांचे नयनरम्य रिंगण, सहावीच्या चिमुकल्यांचे अभ्यासपूर्ण कीर्तन

**बीड :** टाळ-मृदुंगाचा गजर, ज्ञानोबा-तुकाराम चा जयघोष, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या शेकडो चिमुकल्या वारकरी मुली आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या नयनरम्य रूपाने शनिवार २५ जुलै रोजी बीड शहरातील माइलस्टोन इंटरनॅशनल स्कूलचा परिसर अक्षरशः प्रति-पंढरपूर बनून गेला होता. निमित्त होते शाळेच्या वतीने आयोजित भव्य आषाढी एकादशी सोहळ्याचे. यावेळी शाळेच्या मैदानावर तब्बल ८०० विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभूतपूर्व रिंगण सोहळ्याने उपस्थितांचे लक्ष वेधले. याशिवाय सहावीच्या चिमुकल्या कीर्तनकारांनी अभ्यासपूर्ण कीर्तनाची मांडणी केली.

शाळेच्या विस्तीर्ण प्रांगणात पार पडलेला हा सोहळा भारतीय संस्कृती आणि संस्कारांचा अनोखा त्रिवेणी संगम ठरला.पारंपारिक वारकरी पोशाखात, कपाळावर बुक्का लावलेले चिमुकले हातात भगव्या पताका घेऊन अत्यंत शिस्तीत उभे होते. त्यांच्या रांगेत विठ्ठल-रुक्मिणी आणि इतर संतांच्या वेशातील विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या चिमुकल्या वारकऱ्यांची वेशभूषा आणि त्यांचा उत्साह पाहून जणू पंढरीची वारीच माइलस्टोनमध्ये अवतरली आहे, असा भास होत होता. हा भव्य सोहळा माइलस्टोन संस्थेच्या उपाध्यक्षा नम्रता भानुसे, सचिव ज्ञानेश्वर तांबे आणि मुख्याध्यापिका सारिका जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडला. या उपक्रमात तीनही शाखांमधील सर्व शिक्षक, सहशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

## सरोजनीबाई कुलकर्णी यांचे निधन

**बीड :** सरोजनीबाई सुधाकरराव कुलकर्णी खालापूरीकर (वय 83) यांचे दि.22 जुलै 2026 रोजी निधन झाले. त्यांच्यावर गुरुवार दि.23 जुलै रोजी शोकाकुल वातावरणात एन 6, सेट्रल नाका सिडको छत्रपती संभाजीनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्यात 5 मुले सुना, एक मुलगी जावई व नातू नाती असा परिवार आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथे सेवा शिबिर; नागरिकांना विविध योजनांचा लाभ

### आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड ऑनलाइन सेवा आणि पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा लाभ

कडा (प्रतिनिधी)* – महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष *शंकर देशमुख* यांच्या पुढाकारातून कडा येथील श्रीराम पेठेतील भाजपा कार्यालयाजवळ सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध शासकीय योजनांचे *मोफत सेवा शिबिर* आयोजित करण्यात आले. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



सकाळी १० वाजल्यापासून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध योजनांची माहिती घेतली व नोंदणी केली. या शिबिरामध्ये *८४ नागरिकांची आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, **५३ नागरिकांचा पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांचा विमा, तसेच **५३ नागरिकांची रेशन कार्डसंदर्भातील ऑनलाइन कामे व विविध अडचणींचे निराकरण* करण्यात आले.

पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा *₹२० प्रीमियम प्रत्येक लाभार्थ्याच्या वतीने स्वतः शंकर देशमुख यांनी भरला*, ही बाब विशेष कौतुकास्पद ठरली. त्यामुळे अनेक गरजू नागरिकांना सामाजिक सुरक्षेचे कवच उपलब्ध झाले.

रेशन कार्डाशी संबंधित ऑनलाइन प्रक्रिया करण्यासाठी कडा परिसरातील नागरिकांना यापूर्वी आष्टी येथे जावे लागत होते. मात्र या शिबिरातच अर्ज, दुरुस्ती व इतर तांत्रिक अडचणींचे निराकरण झाल्याने नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचले. याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांपुरता कार्यक्रम न ठेवता समाजोपयोगी व लोकहिताचा उपक्रम राबविल्याबद्दल ग्रामस्थांनी शंकर देशमुख यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणारे असे सेवा शिबिर भविष्यातही नियमित आयोजित करावेत, अशी अपेक्षाही यावेळी अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

## बी एल ओ यांनी घरोघरी जाऊन मतदार पडताळणी करावी : अनिल बोर्डे

**गेवराई प्रतिनिधी :-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादीच्या सखोल निरीक्षण एस आय आर (SIR) मोहिमेअंतर्गत बीएलओ यांनी घरोघरी जाऊन पडताळणी करावी, अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केली आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी या मोहिमेबाबत जिल्हाधिकारी व बीएलओ यांना महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.

**निवडणूक आयोगाच्या सूचनानुसार :**

**1) मोहीम कालावधी :** 30 जून 2026 पासून सुरू झालेली ही मोहीम 8 ऑगस्ट 2026 पर्यंत चालणार आहे.

**2) घरोघरी भेट :** प्रत्येक प्रत्येक BLO ने आपल्या विभागातील प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देणे बंधनकारक आहे.

**3) तीन वेळा भेट :** मतदार घरी नसल्यास किमान तीन वेळा भेट देऊन त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

**4) गणना प्रपत्र :** शहरामध्ये एका ठिकाणी बसून अर्ज न स्वीकारता, मतदाराचा अचूक पत्ता शोधून त्याच्या घरी जाऊनच गणना $प्रपत्र भरून घ्यावे.

**`5) बंदी:** कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात बसून नोंदणी घेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर अनिल बोर्डे म्हणाले," प्रत्येक पात्र मतदाराची अचूक नोंद व्हावी यासाठी आयोगाने घातलेले नियम पाळणे आवश्यक आहे. काही बी एल ओ एकाच ठिकाणी बसून काम करत असलेल्या तक्रारी आहेत. अशा प्रकारा मुळे अनेक मतदाराची नावे वगळली जाण्याची शक्यता आहे. तरी बीएलओ यांनी नियमाचे काटे कोर पालन करून घरोघरी भेटी द्याव्यात अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केली आहे.

## अंबाजोगाईत 28 जुलैला 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'; विविध योजनांचा मिळणार लाभ

**अंबाजोगाई :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विशेष उपक्रम म्हणून 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. अंबाजोगाई-कैज विधानसभा मतदारसंघातील हे शिबिर मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आर्यवीर मंगल कार्यालय, बीड रोड, अंबाजोगाई येथे होणार आहे.

महसूल विभागाशी संबंधित सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अडचणींचे तातडीने निराकरण करण्याबरोबरच विविध शासकीय डिजिटल सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देणे, हा या शिबिराचा प्रमुख उद्देश आहे. या शिबिरात महिलांना शेतकरी प्रमाणपत्र वाटप, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, तुकडेबंदी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक क्षेत्र घोषित करणे, शेतजमीन कौटुंबिक वाटणीपत्रावर नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील पात्र लाभार्थ्यांना लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले वाटप करणे, ॲग्रीस्टॅक (फार्मर आयडी) नोंदणी, अकृषिक परवानगी, ई-पीक पाहणी पत्रिका वाटप आदी सेवा दिल्या जाणार आहेत.

या शिबिरास खासदार बजरंग सोनवणे,आमदार नमिताताई मुंदडा , अंबाजोगाई नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा, विधानसभा क्षेत्रप्रमुख अक्षय मुंदडा , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे-जिरंगे,

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे , अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, केजचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, केज नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सिताताई प्रदीप बनसोड, यांच्यासह विविध प्रशासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या शिबिराचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन अंबाजोगाई-कैज तहसील कार्यालय, महसूल अधिकारी व कर्मचारी संघटना, ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संघटना तसेच शिपाई व महसूल सेवक संघटना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात आषाढी एकादशी निमित्त मोठ्या थाटामाटात व उत्साहात बालगोपालाच्या दिंडीचे आयोजन

अंबड (प्रतिनिधी ) - आज दिनांक 25 जुलै 2026 रोजी आषाढी एकादशी निमित्त लाखोच्या संख्येने वारकरी भक्त पंढरपूर मध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात आषाढ महिन्यात शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला देवशयनी आषाढी एकादशी असे म्हणतात.

कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रुक्माई यांची पालखी मोठ्या थाटामाटात सजवण्यात आली. विद्यार्थी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भारतीय संत परंपरे नुसार वारकरी वेशभूषा विविध संतांची वेशभूषा साकारून वारकरी संप्रदायाप्रमाणे सहभागी झाले. यांप्रसंगी संस्कार केंद्रतील श्रीमती वाघमारे मॅडम यांच्या हस्ते व सर्व शिक्षकवृंदांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भगवे झेंडे टाळ मृदंग मुखात अखंड हरिनामाचे नामस्मरण करीत दिंडी शाळेच्या प्रांगणातून राऊत नगर, कोर्ट रोड वडगावकर हॉस्पिटल ,मत्स्योदरी ज्ञानमंदिर, तसेच रमेश शहाणे यांच्या घरात पासून विठ्ठल रुक्माई मंदिर या ठिकाणी पोहोचली. दिंडी चालत असताना विद्यार्थ्याने फुगडी विविध ,लेझीम प्रात्यक्षिक ,पावली ,विठुरायांचा नामस्मरण करीत भगवंताच्या भेटीचं आनंद घेतला. विविध ठिकाणी माता पालक यांनी पालखीचे पूजन करून पुष्पवृष्टी करण्यात आले. भक्तिमय वातावरणामुळे परिसर आनंदाने दुमदुमून गेले.



यावेळी व्यासपीठावरती शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.दीपक भैया ठाकूर( जिल्हा उपाध्यक्ष - भा ज पा जालना) डॉक्टर राजेंद्रजी भाला, अंबड नगर परिषदचे नगराध्यक्ष माननीय श्री केदारजी कुलकर्णी, राजेंद्रजी डहाळे, घुगे सर, माधुरीताई बागडे, सुषमाताई भाला, नगरसेवक बाळू शहाणे, हनुमानजी धांडे, भाई जामदरे , शिवप्रसादजी लाहोटी, भाजपा नेते रमेश शहाणे,बाळासाहेब पांढरे , नरेश बुंदलखंडे,बांगर सर , विनायक सर, तसेच कॉलनीतील प्रतिष्ठित उद्योजक व नामांकित भक्तगण असे सर्व मान्यवर तसेच विद्यार्थी सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

यावेळी शिशुवाटिका प्रमुख श्रीम. प्रणिता वाघमारे ताई , सौ. रेखा देशमुख मॅडम , श्रीमती निशा जपे मॅडम व पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी भक्ती गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कलोपासक मंडळ प्रमुख श्री. अनिल चव्हाण सर यांनी केले. विद्यार्थ्यांनी विविध भक्ती गीते अभंग धार्मिक भारुडे सादर केली. यानंतर अध्यक्षीय समारोप करताना मा.श्री.दीपक भैय्या ठाकूर म्हणाले विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक व धार्मिक वारसा जपवणूक व्हावी व विद्यार्थ्यांमध्ये एकात्मिक समरसता निर्माण व्हावे यासाठी दिंडी तसेच धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. हा मोलाचा संदेश आपण आपल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजावा यासाठी आपल्या शाळेच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात येते. त्यानंतर महाआरतीसाठी मा श्री.दीपक भैय्या ठाकूर व मा श्री.डॉ.राजेंद्र भाला सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. विनायक भैया चोथे यांनी साबुदाणा खिचडी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिली त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी रांगेत विठ्ठल-रुक्माई चे दर्शन घेऊन फराळ घेतले.कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन- श्री. गजानन उबाळे सर यांनी केले. आभार प्रदर्शन - श्री अनिल चव्हाण सर यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील सर्व माता पालक उपस्थित होते.

## हातभट्टीची दारू बनवणाऱ्या अंबाजोगाई तालुक्यातील सराईत गुन्हेगारावर एमपीडीए अंतर्गत कारवाई

**बीड, 26 जुलै :** हातभट्टीची दारू तयार करून तिचा चोरटा व्यापार करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करून त्याची थेट हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. बाबासाहेब रुपचंद आडे (वय ४६, रा. राडी तांडा, ता. अंबाजोगाई) असे या सराईत आरोपीचे नाव आहे.

आरोपी बाबासाहेब आडे याच्यावर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात हातभट्टीची दारू तयार करणे, जवळ बाळगणे, चोरटी विक्री व वाहतूक करणे अशा स्वरूपाचे एकूण सहा गुन्हे दाखल आहेत. यापैकी चार गुन्हे न्यायप्रविष्ट असून दोन गुन्ह्यांचा तपास अद्याप सुरु आहे. यापूर्वी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करूनही तो पोलिसांना न जुमानता पुन्हा अवैध व्यवसाय करत होता. त्याच्या या कृत्यांमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला होता. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या सूचनेनुसार अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी या आरोपीविरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी २३ जुलै रोजी स्थानबद्धतेचे आदेश पारित केले. त्यानुसार २५ जुलै रोजी दुपारी आरोपीला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीनंतर हर्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले आहे.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक हृषीकेश शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले, सहायक पोलीस निरीक्षक जगताप, पोलीस हवालदार देशमाने, घोळवे, महिला पोलीस अंमलदार ज्योती कापले तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस उपनिरीक्षक अभिमन्यू औताडे, गोविंद भताने, रामचंद्र केकाण यांच्या पथकाने केली.

## पूर्णवादी बँकेत पारनेरकर महाराज यांच्या जन्मतिथी निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन

**बीड :** पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म. बीड द्वारे दि. २७/०७/२०२६ रोजी प.पू. पूर्णवाद वर्धिष्णू डॉ. विष्णु महाराज पारनेरकर व दि. २९/०७/२०२६ रोजी प.पू. पूर्णवाद प्रणेते डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे जन्मतिथी निमित्त एकूण २५ शाखांद्वारे १९ ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२७/०७/२०२६ रोजी काळेवाडी पुणे, सातारा परिसर छ. संभाजीनगर, अहिल्यानगर, जालना रोड छ. संभाजीनगर, माजलगाव, जालना येथील शाखांमध्ये रक्तदान शिबीर होईल, दि.२८/०७/२०२६ रोजी शेंद्रा, वाळूज छ.संभाजीनगर येथील शाखांमध्ये रक्तदान शिबीर होईल तसेच दि.२९/०७/२०२६ रोजी बीड, परळी, अंबाजोगाई, लातूर, जामखेड, शिरूर कासार, संगमनेर, नाशिक, सिंहगड रोड पुणे, परभणी येथील शाखांमध्ये रक्तदान शिबीर होईल. या सर्व ठिकाणच्या रक्तदान शिबीरात उस्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर, तसेच सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी यांनी केले.

## संस्कारच्या चिमुकल्यांनी केला,विठ्ठल नामाचा जयघोष

बीड (प्रतिनिधी) येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागामध्ये आषाढी एकादशीनिमित्त बालसभेचे आयोजन करण्यात आले .या प्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी आणि विभागप्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर व बालाध्यक्ष कु. वेदिका बनसोडे प्रमुख पाहुण्या कु. स्वरा राजपूत व श्रीमती प्रतीक्षा बुंदेले उपस्थिती होत्या.यावेळी या सर्वांच्या हस्ते विठ्ठल -रुक्मिणीच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी श्रीमती पानखडे व्ही. आर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी विठुरायाच्या गोष्टी, अभंग ,गवळणी, भक्ती गीते सादर करून आपला भक्ती भाव सिद्ध केला.

श्रीमती डोळस व्ही व्ही यांनी संचलन केले. कार्यक्रमास बहुसंख्येने पालक उपस्थित होते . याप्रसंगी शालेय पोषण आहार प्रमुख श्रीयुत. कुलकर्णी जीआर यांनी केळीचे वाटप केले व श्रीमती वाघ यांनी सर्वांचे आभार मानले. शेवटी बाल वारकऱ्यांची विठ्ठल नामाच्या जयघोषात शालेय परिसरामध्ये पायी दिंडी काढून रिंगण घालून, फुगड्या खेळून बाल सभेची सांगता करण्यात आली. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक वि. प्र. श्रीमती डोईफोडे ए आर

## कारगिल युद्धातील थरारक अनुभव ऐकून उपस्थितांचे डोळे पाणावले..!

### जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेकडून कारगिलच्या अमर वीरांना कृतज्ञ अभिवादन ; देशभक्तीने भारावले वातावरण

**अंबाजोगाई :** देशासाठी जगणे आणि आवश्यक असेल तर देशासाठी हसत-हसत बलिदान देणे, हीच भारतीय सैनिकांची खरी ओळख आहे, या भावनेचा प्रत्यय देणारा २७ वा कारगिल विजय दिन अंबाजोगाई येथील जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी कारगिल युद्धात सर्वोच्च बलिदान देणाऱ्या अमर शहीद वीर जवानांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करीत त्यांच्या शौर्यगाथांना उजाळा देण्यात आला. संस्थेच्या परिसरातील नियोजित स्मारक स्तंभावर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप यांच्या हस्ते लष्करी शिस्तीनुसार रीतसर शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुष्पचक्र अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. उपस्थितांनी भारतमातेच्या वीर सपूतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन पांडुरंग शेप होते. तर यावेळी संस्थेचे पदाधिकारी माजी सुभेदार आबासाहेब हाके, बाबासाहेब केंद्रे, भरत पांचाळ, अरविंद तपसे, श्रीमती महानंदा पोखरकर, श्रीमती सिंधु निर्मळ, यशवंत व्हावळे, सर्जेराव शिरसाठ, श्री. पवार, दत्ता साळुंके, भगवान कांबळे, श्री.रत्नपारखी, श्री. गौरशेटे, सूर्यकांत मुंडे, महेश सोळुंके, विजयकुमार तपसे, माणिक काजगुंडे, सुधीर धायगुडे, हमीद भाई, महादेव पतंगे, आकाश जाधव, गोपीनाथ काळे, श्री.कुंडगर, सय्यद ख्वाजा, श्री. थोरात, अंकुश काळे, श्री.लाखे, अनिरूद्ध डाके, भागुजी दोडे, श्री.भोसले, अभिमन्यू लोखंडे, वसंत सावंत तसेच संस्थेतील आजी-माजी सैनिक, महिला



भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातील सर्वाधिक भावनिक क्षण म्हणजे कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या माजी सैनिकांनी कथन केलेले अनुभव. हिमालयाच्या बर्फाच्छादित पर्वतरांगांमध्ये उणे तापमानात दिवस-रात्र शत्रूशी दिलेला सामना, सहकाऱ्यांचे बलिदान, रणभूमीवरील संकटांचा सामना आणि विजयासाठी केलेला संघर्ष यांचे त्यांनी अत्यंत जिवंत वर्णन केले. प्रत्येक प्रसंग ऐकताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले, तर संपूर्ण परिसरात देशभक्तीचा आणि सैनिकांविषयी अभिमानाचा भाव दाटून आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी सुभेदार आबासाहेब हाके यांनी कारगिल युद्धाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, युद्धातील महत्त्वाच्या मोहिमा, भारतीय सैन्याचे शौर्य आणि विजयामागील त्याग याविषयी सविस्तर माहिती दिली. कारगिल विजय हा केवळ लष्करी यश नसून भारतीय सैनिकांच्या अदम्य जिद्दी, राष्ट्रनिष्ठा आणि बलिदानाचे सर्वोच्च प्रतीक असल्याचे सुभेदार हाके यांनी सांगितले. तर अध्यक्षीय भाषणात कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप म्हणाले की, कारगिल युद्ध हे भारताच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिले गेलेले पर्व आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जवानांनी अद्वितीय धैर्य, पराक्रम आणि शौर्य दाखवत शत्रूला पराभूत केले. कारगिल विजय दिन हा केवळ विजयाचा उत्सव नसून देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या अमर वीरांना कृतज्ञतेने स्मरण करण्याचा दिवस आहे. देशाचे संरक्षण करणाऱ्या प्रत्येक सैनिकाचा सन्मान करणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे असे कॅप्टन शेप यांनी सांगितले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रभक्तीच्या घोषणांनी झाला. उपस्थित सर्वांनी शहीद जवानांच्या स्मृतीप्रती कृतज्ञता व्यक्त करीत त्यांच्या शौर्यगाथा भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रेरक संकल्प केला. बाबासाहेब केंद्रे यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर, आजी, माजी सैनिक, युवक, युवती, महिला भगिनी, सैनिक परिवार व शहरातील नागरिकांचे संस्थेच्या वतीने आभार मानले.

## सर्व रिपोर्ट सामान्य, तरीही गर्भधारणा होत नाही

कराड - जागतिक आयव्हीएफ दिनानिमित्त सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वृषाली चव्हाण यांनी सांगितले की, सर्व फर्टिलिटी तपासण्या सामान्य असूनही अनेक दांपत्यांना गर्भधारणा होत नाही. अंड्यांची गुणवत्ता, शुक्राणूंचे डीएनए नुकसान, एंडोमेट्रिओसिस, गर्भाशयातील सूक्ष्म समस्या, फॅलोपियन ट्यूब्सची कार्यक्षमता, हार्मोनल असंतुलन आणि जीवनशैलीतील घटक यांसारखी कारणे नेहमीच्या तपासण्यांत दिसून येत नाहीत. एक वर्ष प्रयत्न करूनही किंवा ३५ वर्षांनंतर सहा महिन्यांत गर्भधारणा न झाल्यास फर्टिलिटी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. वेळेवर निदान आणि वैयक्तिक उपचारांमुळे यशस्वी गर्भधारणेची शक्यता वाढू शकते.

## हिंदुस्थान झिंकने पहिल्या तिमाहीत ₹5,469 कोटींचा विक्रमी निव्वळ नफा नोंदवल

**छत्रपती संभाजीनगर :** जगातील सर्वात मोठी इंटिग्रेटेड झिंक उत्पादक आणि जागतिक स्तरावरील पहिल्या १० सिल्व्हर उत्पादकांमध्ये समाविष्ट असलेल्या हिंदुस्थान झिंक लिमिटेडने (बीएसई: ५००१८८ आणि एनएसई: हिंदझिंक) आर्थिक वर्ष २०२७ ची सुरुवात पहिल्या तिमाहीतील आतापर्यंतच्या सर्वात दमदार कामगिरीने केली आहे. कंपनीने कामकाजातून ₹१३,७४७ कोटींचा आतापर्यंतचा सर्वोत्तम तिमाही महसूल (७७% वार्षिक वाढ), ₹८,०७४ कोटींचा सर्वोच्च तिमाही एबिटा (१०९% वार्षिक वाढ) आणि ₹५,४६९ कोटींचा विक्रमी तिमाही निव्वळ नफा (१४५% वार्षिक वाढ) नोंदवला आहे. या भक्कम आर्थिक कामगिरीचे मुख्य कारण म्हणजे पहिल्या तिमाहीतील २६८ केटी इतके आतापर्यंतचे सर्वाधिक माईंड मेटल उत्पादन आणि ८५१ अमेरिकन डॉलर प्रति टन इतका सर्वात कमी तिमाही झिंक उत्पादन खर्च होय, जे सातत्यपूर्ण परिचालन उत्कृष्टता, शिस्तबद्ध खर्च व्यवस्थापन आणि उद्योगातील आघाडीची स्पर्धात्मकता दर्शवते.

## किआ सिरोस ईव्ही लॉन्च

**नवी दिल्ली:** किआ इंडियाने आपली दुसरी 'मेड-इन-इंडिया' मास-प्रीमियम इलेक्ट्रिक एसयूव्ही, किआ सिरोस ईव्ही, ₹१३.४९ लाख (एक्स-शोरूम) या सुरुवातीच्या किमतीत लॉन्च केली आहे. ४२किलोवाट बॅटरी व्हेरिएंटची किंमत ₹१३.४९ लाख आहे, तर ५१.४किलोवाट एक्सटेंडेड रेंज व्हेरिएंटची किंमत ₹१६.९९ लाख (एक्स-शोरूम) आहे. देशभरातील किआ डीलरशिपवर ३० जुलै, २०२६ पासून विक्री सुरू होईल. कंपनीने सिरोस ईव्हीसोबत उद्योगातील सर्वात मजबूत मालकी योजनांची घोषणा केली आहे. यामध्ये ३ वर्षांनंतर ८०% पर्यंत खात्रीशीर बायबॅक, बॅटरी-ॲज-अ-सर्व्हिस (BaaS) अंतर्गत ₹७.९९ लाख पासून सुरू होणारी प्रारंभिक मालकी आणि ₹३.३ प्रति किमी पासून सुरू होणारे बॅटरी ईएमआय यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, ग्राहकांना १५ वर्षांची आजीवन हाय-व्होल्टेज बॅटरी वॉरंटी (अमर्याद किमी) देखील मिळेल.

## गर्भधारणेपूर्वी फॉलो-अप का महत्त्वाचा आहे

**अहिल्यानगर:** पॉलीसिस्टिक ओव्हरी डिसीज ( हा प्रजननक्षम वयातील महिलांमध्ये आढळणारा सर्वात सामान्य हार्मोनल विकार आहे. डॉ. वैशाली किरण सिद्धावरम, विभागप्रमुख – प्रसूती, स्त्रीरोग व IVF, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल, मणिपाल हॉस्पिटल्स नेटवर्क, अहिल्यानगर, म्हणतात, “अनेक महिलांना वर्षांपूर्वी पीसीओडी चे निदान झालेले असते. त्या महिलांना जर मासिक पाळी नियमित होत असेल किंवा लक्षणे दिसत नसतील तर गर्भधारणेपूर्वी वैद्यकीय तपासणीची गरज नाही असे वाटते. पण पीसीओडी हा एकदाच होणारा निदान नाही. हार्मोनल संतुलन, अंडोत्सर्जन, शरीराचे वजन, इन्सुलिन संवेदनशीलता आणि अंडाशयाचे कार्य वर्षानुवर्षे मोठ्या प्रमाणात बदलू शकते. गर्भधारणेपूर्वीची तपासणी या बदलांना लवकर ओळखण्यास मदत करते आणि महिलांचे आरोग्य सुधारून गर्भधारणेची शक्यता वाढवते..

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा तिमाही नफा 317 कोटी रुपये

**छत्रपती संभाजीनगर :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड ने आज जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीसाठीची आर्थिक कामगिरी जाहीर केली.उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या कार्यकारी संचालक सुश्री कॅरोल फुर्टाडो म्हणाल्या, “जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता कायम असतानाही देशांतर्गत उच्च-फ्रिक्वेन्सी आर्थिक निर्देशकांनी स्थैर्य दाखवले आहे. आरबीआय ने तटस्थ भूमिकेसह धोरणात्मक रेपो दर 5.25% वर कायम ठेवला असून, आर्थिक वर्ष 27 साठी वास्तविक जीडीपी वाढीचा अंदाज सुधारित करून 6.6% केला आहे. तसेच संपूर्ण वर्षासाठी महागाई 5.1% राहून निर्धारित मर्यादेत राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. याचबरोबर बँकिंग क्षेत्रात कर्जाची निरोगी मागणी आणि स्थिर ठेवींसह लवचिकता कायम असल्याचेही नमूद केले आहे.बँकेने शाखा विस्तारासह विविध व्यवसाय विभागांमध्ये आणखी एका तिमाहीत मजबूत वाढ नोंदवली असून जून’26 अखेर शाखांची संख्या 814 वर पोहोचली आहे. ठेवी वार्षिक 24.6% आणि तिमाही ते तिमाही 5.4% ने वाढून 48,129 कोटी रु. झाल्या, तर एकूण लोन बुक वार्षिक 28.9% आणि तिमाही ते तिमाही 5.5% वाढून 42,903 कोटी रु.वर पोहोचले.

## 8,500 कोटी रुपयांचा ट्रान्समिशन प्रकल्प मिळाला

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील सर्वात मोठी खासगी ट्रान्समिशन आणि वितरण कंपनी तसेच जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांत कार्यरत अदाणी समूहाचा भाग असलेल्या अदाणी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (AESL) ने आज जाहीर केले की, कंपनीला आंध्र प्रदेशातील सुमारे 8,500 कोटी रुपयांचा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रकल्प मिळाला आहे. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम (विझाग) परिसरातील प्रस्तावित ग्रीन हायड्रोजन आणि ग्रीन अमोनिया प्रकल्पांसाठी वीज प्रसारण व्यवस्था (पहिला टप्पा)" हा प्रकल्प भारत सरकारच्या टॅरिफ-आधारित स्पर्धात्मक निविदा (TBCB) प्रक्रियेद्वारे मंजूर करण्यात आला असून, या निविदेत एईएसएलने सर्वात स्पर्धात्मक बोली लावून हा प्रकल्प मिळवला आहे

## नवीन गॅलेक्सी अल्ट्रा2 आणि वॉच9साठी ऑफर्सची घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** - सॅमसंगने आपल्या वॉच लाइनअपमधील सर्वात नवीन श्रेणी गॅलेक्सी वॉच अल्ट्रा२ आणि गॅलेक्सी वॉच९ भारतामध्ये प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध झाल्याची घोषणा केली आहे. हे दोन्ही मॉडेल्स दररोज २४ तास वापरण्यायोग्य असण्यासोबत सतत आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. ते आरोग्याशी संबंधित माहितीचे रूपांतर झोप, शारीरिक हालचाली, हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य आणि रिकव्हरी यांसारख्या उपयुक्त मार्गदर्शनामध्ये करतात."आरोग्य सेवा प्रतिबंधात्मक, निरंतर आणि वैयक्तिक गरजांनुसार तयार केलेली असणारे भविष्य घडवण्यासाठी एआयच्या क्षमतेचा वापर करणे हे आमचे ध्येय आहे. गॅलेक्सी वॉच अल्ट्रा२ आणि गॅलेक्सी वॉच९ या संकल्पनेला प्रत्यक्षात आणतात. यामध्ये प्रगत आरोग्य ट्रॅकिंग वैशिष्ट्ये दिली आहेत, जी वापरकर्त्यांसाठी एक विश्वासू साथीदार म्हणून काम करतात आणि त्यांच्या आरोग्याच्या प्रवासात सक्रिय माहिती व वेळेवर सूचना पुरवतात," असे सॅमसंग इंडियाचे एमएक्स बिझनेसचे व्हाईस प्रेसिडेंट आदित्य बब्बर म्हणाले.

## नवीन फोल्डेबल गॅलेक्सी झेड सिरीज आता भारतात प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध

गुरुग्राम, भारत - जुलै २३, २०२६ - सॅमसंगने घोषणा केली आहे की, त्यांची नवीन फोल्डेबल गॅलेक्सी झेड सिरीज आता भारतात प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध आहे. या श्रेणीमध्ये सर्वोत्तम कंटेंट वापरासाठी गॅलेक्सी झेड फोल्ड८, प्रगत उत्पादकता व निर्मितीसाठी गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, आणि सॅमसंगचे आजवरचे सर्वात स्लिम फ्लिप डिवाईस गॅलेक्सी झेड फ्लिप८ यांचा समावेश आहे. फोल्डेबल इनोव्हेशनच्या सात पिढ्यांवर आधारित ही सिरीज गॅलेक्सी एआयद्वारे संचालित आहे, ज्यामध्ये पारदर्शकता, गोपनीयता आणि वापरकर्त्याचे नियंत्रण कायम ठेवून कमी स्टेप्समध्ये टास्क्स पूर्ण करण्यास मदत करण्यासाठी जेमिनी इंटेलिजन्सचा समावेश आहे.

## 'कसं काय माऊली, तब्येत बरी आहे ना?' — आयुक्त संजय काटकर यांच्या आपुलकीच्या संवादाने जिंकली वारकऱ्यांची मने

# 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' उपक्रमांतर्गत महाआरोग्य शिबिराची पाहणी

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी वारीनिमित्त सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या उपक्रमांतर्गत तीन रस्ता येथे सुरू असलेल्या महाआरोग्य शिबिराला वारकरी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या शिबिरास आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक संजय काटकर यांनी भेट देऊन आरोग्य सेवांचा आढावा घेतला.

शिबिराच्या पाहणीदरम्यान नेत्र तपासणीसाठी आलेल्या एका ज्येष्ठ महिला वारकरी यांच्याशी आयुक्त काटकर यांनी अत्यंत आत्मीयतेने संवाद साधत, "कसं काय माऊली, तब्येत बरी आहे ना?" अशी प्रेमळ विचारपूस केली. त्या नेत्र तपासणी व चष्मा घेण्यासाठी आल्याचे समजताच त्यांनी स्वतः त्यांना नेत्र तपासणी विभागात नेले. तेथे तपासणीनंतर त्यांना मोफत चष्म्याचे वितरण करण्यात आले. आयुक्तांच्या या आपुलकीच्या वागणुकीमुळे उपस्थित वारकऱ्यांच्या मनाला विशेष स्पर्श झाला.

यावेळी आयुक्तांनी डॉक्टर, परिचारिका, आशा स्वयंसेविका, आरोग्यदूत तसेच सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांशी संवाद साधून



आरोग्य सुविधांची माहिती घेतली. वारकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या औषधोपचार, आपत्कालीन उपचार व्यवस्था, जनजागृती उपक्रम आणि इतर सेवांबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले.

यंदाच्या आषाढी वारीत पंढरपूर शहरात २१ ठिकाणी आरोग्य सेवा केंद्रे, आयसीयू सुविधा, 'आपला दवाखाना', ग्रामीण रुग्णालये तसेच वारी मार्गावरील विविध आरोग्य केंद्रांद्वारे वारकऱ्यांना मोफत उपचार, औषधे, नेत्र तपासणी, चष्मा वितरण आणि अन्य आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाने यावर्षी "कसं काय माऊली, तब्येत बरी आहे ना?" या भावनिक संवादातून वारकऱ्यांपर्यंत आरोग्य सेवेचा मानवी स्पर्श पोहोचविण्याचा अभिनव प्रयत्न केला आहे. या उपक्रमाला वारकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तीन रस्ता येथील महाआरोग्य शिबिरात २६ जुलैपर्यंत सर्व आरोग्य सेवा वारकरी भाविकांसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध राहणार आहेत.

## बालवारकऱ्यांच्या दिंडीने भक्तिमय वातावरण ; आश्रमशाळेत आषाढी एकादशी उत्साहात

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि. २५ जुलै - तालुक्यातील गराडा येथील कै. गुरुदयालसिंग राठोड प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत आषाढी एकादशी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि संस्कारप्रधान उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. विठ्ठलनामाच्या गजरात निघालेल्या बालवारकऱ्यांच्या दिंडीने संपूर्ण गराडा गाव भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख अनिता चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे पौराणिक, आध्यात्मिक व वैज्ञानिक महत्त्व समजावून सांगितले. वारकरी संप्रदायातील समता, भक्ती, सेवा आणि सदाचार या मूल्यांची माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची जपणूक करण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले.

संस्थेचे सचिव प्रवीण राठोड, संचालक संदीप राठोड तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेखर मांडे आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुखदेव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल-रुक्मिणी तसेच वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या निनादात आणि "विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल!" या नामघोषात पालखी व बालदिंडीने गराडा गावातून प्रस्थान केले.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी रिंगण, पाऊलीचा खेळ, टाळांच्या ठेक्यावर अभंगगायन तसेच वारकरी परंपरेचे आकर्षक सादरीकरण केले. गावातील नागरिकांनी पालखीचे दर्शन घेत बालदिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना

## श्री आजुबाई विद्यालयात वारकरी परंपरेचा संस्कारमय जागर



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.२६ जुलै - आषाढी एकादशीचे औचित्य साधत शहरातील श्री आजुबाई विद्यालयात बाळ गोपाळ वारकरी दिंडी व पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. विठ्ठलनामाच्या गजरात निघालेल्या दिंडीने विद्यालय परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून हातात टाळ, चिपळ्या आणि भगवे ध्वज घेत "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" अशा जयघोषात पालखी मिरवणुकीत सहभाग घेतला. विठ्ठल-रुक्मिणींच्या सुशोभित पालखीसमवेत अभंग, भजन आणि हरिनामाचा गजर करत विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडविले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संत परंपरा, वारकरी संप्रदाय, समता, बंधुभाव, सेवा आणि भक्ती यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. भारतीय संस्कृतीची ओळख आणि सामाजिक ऐक्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. या प्रसंगी श्री आजुबाई शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष सुधाकर देवकर तसेच संस्थेच्या संचालिका वंदना देशमुख उपस्थित होत्या. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी सर्वांच्या सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि समाजात सद्भावना नांदावी, अशी प्रार्थना करण्यात आली.

## विठुरायाच्या सेवेसह स्वच्छतेचा जागर; मनपाची 'स्वच्छतेची वारी'

### बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूर मार्ग स्वच्छ करत वारकऱ्यांना दिला स्वच्छतेचा संदेश

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त छोट्या पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा आणि स्वच्छतेचा संदेश जनमानसात पोहोचविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे आयोजित "स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी" हा उपक्रम उत्साहात पार पडला.



महावीर चौक येथून महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते स्वच्छता दिंडीला प्रारंभ झाला. यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, शहर सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, आयुक्त अमोल येडगे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे २०० हून अधिक सफाई कर्मचारी, आयसीटी टीम आणि १० हून अधिक घंटागाड्यांच्या सहभागातून बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूर मार्गाची स्वच्छता करण्यात आली. कचरा संकलन, जनजागृती आणि वारकऱ्यांना आवश्यक मदत करण्यासोबतच आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिकाही सज्ज ठेवण्यात आली.

महापौर समीर राजूरकर यांनी हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे सांगत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी वारकऱ्यांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या नियोजनाचे स्वागत केले. आयुक्त अमोल येडगे यांनी स्वच्छतेचा संदेश प्रत्येक वारकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे सांगितले.

## भैरवनाथ ग्रामिण बिगर शेती सह. पतसंस्थेची 28 वी वार्षिक सर्वसाधारण सभा

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२६ जुलै :** सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१ ऑगस्ट शनिवार रोजी संस्थेच्या कार्यालयात सकाळी १०.०० वाजता करण्याचे ठरविले आहे.संस्थेच्या सर्व सभासदांना अहवाल पाठविला आहे. ज्यांना अहवाल मिळाला नाही अशा सभासदांनी हाच अहवाल समजून सभेस वेळी व स्थळी उपस्थित रहावे ही विनंती सभेपुढील येणारे विषय विषय क्रमांक एक मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत चा वृत्तांत वाचून कायम करणे,विषय नंबर दोन सन.२०२५-२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,

विषय नंबर तीन सन.२०२५-२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,विषय नंबर चार सन. २०२५-२६ करिता संचालक मंडळांनी शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे,विषय नंबर पाच सन.२०२६-२७ करिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे,विषय नंबर सहा सन.२०२५-२६ ऑडिट दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे,विषय नंबर सात स.न.२०२६-२७ करिता लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,विषय क्रमांक आठ चेअरमन यांना मानधन ठरविण्याबाबत,विषय क्रमांक नऊ मे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत, तरी सर्व संचालक व सभासद बंधू व निमंत्रित मान्यवरांनी सभेस उपस्थित राहावे असे अहवाल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर(आबा) दयाळराव काळे व व्यवस्थापक धनराज औरंगे, लिपिक विजय जावळे,शिपाई योगेश काळे यांनी केले आहे.

## एमजीएममध्ये ॲड. व्ही. डी. साळुंके आणि ॲड. एस. के. कदम यांचा गौरव

## कायदा व्यवसायात प्रामाणिकपणा, निष्ठा आणि परिश्रमाला पर्याय नाही : ॲड. व्ही. डी. साळुंके

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्चच्या वतीने बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा यावर सलग पाचव्यांदा निवड झाल्याबद्दल ॲड. व्ही. डी. साळुंके तसेच ॲडव्होकेट्स असोसिएशन, बॉम्बे उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे अध्यक्ष ॲड. एस. के. कदम यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या आईनस्टाईन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांच्या हस्ते



शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन दोन्ही मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

सन्मानाला उत्तर देताना ॲड. व्ही. डी. साळुंके यांनी वकिली व्यवसायात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम, व्यावसायिक निष्ठा आणि प्रामाणिकपणा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. मोठा वकील होण्यापेक्षा चांगला वकील होण्याचा प्रयत्न करावा. पक्षकारांचा विश्वास आणि सद्भावना हीच वकिलाची खरी संपत्ती असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. एस. के. कदम यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक नीतिमूल्यांचे पालन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि विश्वासार्हतेच्या बळावर कायदा क्षेत्रात यश मिळविण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानामुळे कायदा शिक्षणाचे स्वरूप बदलत असल्याचे सांगितले. केवळ कायद्याचे ज्ञान पुरेसे नसून पत्रकारिता, भाषा आणि इतर विषयांचे ज्ञानही आत्मसात करून जागतिक दृष्टिकोन विकसित करण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. सी. एम. राव, प्राध्यापक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रेखा शेळके यांनी, सूत्रसंचालन डॉ. झरताब अन्सारी यांनी, तर आभार प्रा. रीना मानधनी यांनी मानले.

# सोयगाव शहरातील शिबिरात 2000 दिव्यांग बांधवांची मोफत आरोग्य तपासणी - 200 लाभार्थ्यांना जागेवरच दिव्यांग प्रमाणपत्र वाटप

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२६ जुलै :** शहरातील उपजिल्हा रुग्णालयात येथे झालेल्या महाआरोग्य शिबिर तसेच मोफत दिव्यांग आरोग्य तपासणी व नूतनीकरण प्रमाणपत्र वितरण शिबिरात २०० दिव्यांगना जागेवरच दिव्यांग प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. आहे. या शिबिरात तालुक्यातील २ हजार विविध दिव्यांगाची आरोग्य तपासणी करण्यात आली होती.यामध्ये २०० जणांना जागेवरच प्रमाण पत्र वितरण करण्यात आले. राज्यातील हा पहिलाच तालुकास्तरावर प्रयोग असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर ( जिल्हा शल्यचिकित्सक चिखलठाणा संभाजीनगर ) यांनी दिलेल्या भेटदरम्यान सांगितले.

तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी हा उपक्रम



सुरू करण्यात आला असून यात लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्ड सुद्धा वितरीत करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाचे अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी दिली. तालुका भाजपचे वतीने आयोजित या एक दिवसीय दिव्यांगाच्या शिबिरात सायंकाळी सहा वाजेपर्यंत २००० दिव्यांगा ची तपासणी पूर्ण झाली होती तर दोनशे दिव्यांगाना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले होते.भाजप चे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी

यांनी आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची भेट घेऊन ही मोहीम राबवण्याची मागणी केली होती.त्या अनुसार या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

> शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन व नोंदणी सुविधा.श्रावणबाळ योजना,संजय गांधी निराधार योजना आदी योजनांची माहिती.दिली जाणार आहे. या शिबिरामुळे दिव्यांग नागरिकांना पेन्शन, शिक्षण,रोजगार, घरकुल, बँक कर्ज तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार असून, जिल्हा रुग्णालयापर्यंतचा वेळ, खर्च व धावपळही वाचणार आहे.
>
> - इद्रिस मुलतानी,भाजप अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष

दिव्यांग नागरिकांना प्रमाणपत्रासाठी छत्रपती संभाजीनगर येथे खेट्या माराव्या लागत होत्या. आता त्यांना जागेवरच प्रमाणपत्र देण्यात आले आहे.या शिबिरात तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दोन हजार दिव्यांग नागरिकांची मोफत वैद्यकीय तपासणी करून,पात्र २०० लाभार्थ्यांना जागेवरच नवीन व नूतनीकरण दिव्यांग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे.दरम्यान या शिबिरात जिल्हा परिषद सदस्या माहीन मुलतानी, जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,जेष्ठ नेते सुरेश बनकर,अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,सोयगाव पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण,सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील,पश्चिम चे तालुकाध्यक्ष सुनील जाधव,पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,जयश्री पवार,जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, सोयगाव शहराध्यक्ष मंगेश सोहनी,व्ही जे एन टी चे प्रदेशाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण,मयुर मनगटे,गजानन पवार,संजीवन सोनवणे,राजेंद्र जावळे,वसंत बनकर,माजी उपगराध्यक्ष योगेश पाटील,आदींनी पुढाकार घेतला होता.

प्रासंगिक

# पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको!

प्रवीण दीक्षित

दिल्लीमध्ये जंतरमंतर येथे 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) वतीने 'नीट' पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून सीजेपीच्या वतीने संसद भवनावर मोर्चा काढण्यात आला आणि तिथे पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला, म्हणून सर्वत्र पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. पण पोलिसांची बाजू कोणीच समजून घेत नाही.

स्वतःला विद्यार्थी म्हणवून घेणारे नेमके कोण आहेत, ते माहीत नाही. स्वतःला विद्यार्थ्यांचे नेते म्हणवून घेणारे कोणत्या परीक्षेला बसले होते आणि त्या परीक्षांमध्ये काय घोटाळा झाला होता, याचा कुठेही उल्लेख नाही. स्वतःला नेते म्हणवणाऱ्यांपैकी अभिजित दीपके नावाचा कोणीतरी अमेरिकेतून येतो आणि मला आंदोलन करायचे म्हणतो. त्याला दिल्ली पोलिसांनी लगेच जंतरमंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली. म्हणजे त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, असेही नाही. हे सर्व युवक तिथे आंदोलनाला बसले आणि त्यांनी एकच मागणी लावून धरली आणि ती म्हणजे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. शिक्षणव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा हव्या आहेत, शासनाकडून यासंदर्भात त्यांच्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल त्यांच्याकडून लेखी मुद्दे आलेले दिसले नाहीत. दरम्यान पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळलेल्या लोकांवर सरकारने कडक कारवाई केली. ती सर्व मंडळी आज तुरुंगात आहेत. पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर 'नीट' परीक्षा तातडीने रद्द करण्यात आली आणि त्यातील त्रुटी दूर करून पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने ती पुन्हा घेण्यात आली. २२ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, त्यापैकी ११ लाख विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला. म्हणजे या विद्यार्थ्यांची तशी तक्रार नाही. त्यांची एवढीच अपेक्षा होती, की आमची परीक्षा व्यवस्थित व्हावी आणि चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्षित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा.

सरकारने विद्यार्थ्यांची ही अपेक्षा आपणहून पूर्ण केली. याशिवाय त्यांच्या काही मागण्या असतील तर त्या त्यांनी सरकारला लेखी स्वरूपात द्यायला हव्यात. त्यावर सरकारने विचार करून त्यांची पूर्तता केली असती. पण असे काही न करता त्यांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर करून टाकले. त्याच दिवशी संसदेचे अधिवेशन सुरू होणार होते. भारतीय संसद हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य असल्यामुळे भारतीय न्यायसंहितेच्या कलम '१६३ ब' आणि पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या '१४४' नुसार या परिसरात पाच किंवा अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली. अर्थात संसदेवर मोर्चा काढायचा असेल तरी पोलिस परवानगी देतात, पण त्यासाठी मोर्चा काढणाऱ्यांना आपण कोण आहोत, मोर्चा काढण्याचे कारण काय, मोर्चामध्ये किती लोकांचा सहभाग असणार आहे, जमाव तिथे काय करणार आहे, हे स्पष्ट करावे लागते. सीजेपीने अशी कोणतीही परवानगी घेतली नाही. २० जुलै राजी तिथे देशातल्या अनेक भागांमधून युवक येण्यास सुरुवात झाली. यात विद्यार्थी किती होते, विविध राजकीय पक्षांचे भाडोत्री आंदोलक किती होते, गुंड होते की बेकायदेशीर कामे करणारे होते, याची काहीच कल्पना नव्हती. ही मंडळी आपणहून आलेली नव्हती, तर त्यांना कोणीतरी आणलेले होते. त्यांना आणणाऱ्यांना स्वतःचे चेहरे प्रकाशात येऊ द्यायचे नव्हते. त्यांनी या मुलांना भडकावून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करा, असे सांगितले होते.



मोर्चा निघताना आम्ही पुष्पगुच्छ घेऊन निघालो आहोत असे दाखवण्यात आले. पण हा केवळ देखावा होता. मागे असलेल्या युवकांसमोर कोणतेही नेतृत्व नव्हते, कोण काय सांगत आहे, याकडे त्यांचे लक्ष नव्हते. संसदेवर काही वेळा हल्ले झाले आहेत, हे आपल्याला माहीत आहे. लोकशाहीच्या दृष्टीने संसद ही अत्यंत महत्त्वाची जागा आहे. संसदेवर मोर्चा आल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी 'बॅरिकेड्स'च्या अलिकडे थांबावे आणि आपल्या दोन-चार प्रतिनिधींना सरकारशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, हा दंडक आहे. या मोर्चेकऱ्यांनी मात्र 'बॅरिकेड्स' उधळून लावून किंवा त्यांच्यावर चढून संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे संसदेमध्ये शिरू पाहणाऱ्या लोकांना अडवण्याची पोलिसांची जबाबदारी असते. हे मोर्चेकरी नुसता शिरण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत, तर त्यांनी तिथे जोरदार दगडफेक सुरू केली. त्याचबरोबर या युवकांनी तिथे बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांवरही हल्ले केले आणि काही पोलिसांना बेदम मारहाण करण्यात आली. अगदी पोलिस शिपायापासून विशेष पोलिस आयुक्त दर्जाच्या आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना मारहाण केल्याचे किमान ७२ अधिकृत व्हिडीओज उपलब्ध आहेत. या जमावाने तिथे असलेल्या पेट्रोल पंपावर हल्ला केला, महिला पोलिसांवर हल्ला केला, पत्रकारांवर हल्ला केला. म्हणजे यातून त्यांनी कोणालाच सोडले नाही.

हे कमी की काय म्हणून तिथे उभ्या असलेल्या पोलिसांच्या आणि खाजगी वाहनांची तोडफोडही करण्यात आली. गरीब रिक्षावाल्यांनाही सोडले नाही. हे सगळे होत असताना दीपकेसहित सीजेपीचे नेते युवकांना मारहाणीसाठी आणि मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसत होते. म्हणजे स्वतःची जबाबदारी काय, याची कल्पना नसलेले लोक पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत. मोर्चामध्ये आंदोलक जाळपोळ करत असतील, कोणाला मारहाण करत असतील, सरकारी आणि खाजगी मालमत्तेचे नुकसान करत असतील तर पोलिसांनी ते शांतपणे पाहत राहणे अपेक्षित नाही. त्यांना कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आलेले असते. हिंसक मार्गाने जाणाऱ्या आंदोलकांवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना कायद्याने देण्यात आले आहेत. या जमावाला पोलिसांनी प्रथम शांतता राखण्याचे आवाहन केले, त्यानंतर त्यांना चेतावणी देण्यात आली आणि त्यानंतर कमरेच्या खाली सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. तरी जमाव नियंत्रणात येत नाही म्हटल्यावर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. नळकांड्या फुटल्यावर त्याचे धातूचे काही तुकडे जमावातल्या काहींना लागू शकतात. त्यांना पॅलेट्स म्हणण्यात काही अर्थ नाही. या घटनेनंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एका व्यक्तीला सर्वांसमोर आणले आणि त्याला झालेल्या जखमा पॅलेट्समुळेच झाल्या असल्याचा दावा केला. पण पोलिसांनी पॅलेट गन्सचा वापर केला असता, तर एकाच व्यक्तीला कशा पॅलेट्स लागतील? तिथे जमा झालेल्या शेकडो लाकांना त्या लागल्या असत्या.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या मोर्चासाठी तैनात असलेल्या पोलिसांपैकी १५० हून अधिक पोलिस अधिकारी जखमी झालेत. ते सगळे रुग्णालयात दाखल आहेत. म्हणजे ते काही हल्ला झाल्याचे खोटे सांगत नाहीत. याउलट जमावापैकी कोणालाही रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासली नाही. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये एका मुलीचा मृत्यू झाल्याची आवई उठवली गेली, तीही खोटी ठरली. या सगळ्या घटनाक्रमाचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये चित्रण झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर केला म्हणून त्यांच्यावर खापर फोडणे योग्य नाही. आंदोलकांची संसदेमध्ये चर्चा करायची तयारी नाही. संसद ठरावीक नियमांप्रमाणे चालते. तिथे मुद्द्यांवर चर्चा केली जाते, प्रक्रियेला वेळ लागतो, पण आंदोलकांना सगळे आत्ताच्या आत्ता हवे आहे. योगेंद्र यादव नावाचे महाशय स्वतःला पत्रकार किंवा नेता म्हणवतात. ते म्हणतात, आता निर्णय संसदेत नाही, तर रस्त्यावर होतील. म्हणजे झुंडशाहीचेच राजकारण चालणार का? झुंडशाहीला हे तथाकथित नेतेच प्रोत्साहन देत आहेत. आज दिल्लीमध्ये दंगल झाली, उद्या कर्नाटक, केरळ किंवा इतर बिगर भाजपाशासित राज्यांमध्येही हे होऊ शकेल. सगळीकडे आपल्याला दंगलीच करायच्या आहेत का, हा मुद्दा आहे.

मुंबईमध्येही निदर्शने झालीत. तिथे पोलिसांनी काही लोकांना थोड्या कालावधीसाठी अटक करून सोडून दिले. तर इथले नेते म्हणतात, की तुम्ही कोण आम्हाला हात लावणारे? सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट केले आहे, की रस्ता ही निदर्शने करण्याची जागा नाही. रस्त्यावर वृद्ध लोक असतात, रुग्णवाहिका येत-जात असतात, सामान्य नागरिक कामासाठी बाहेर पडलेले असतात. रस्त्याचा वापर करण्याचा पहिला हक्क त्यांचा आहे. प्रत्येक ठिकाणी काही मैदाने आहेत. अशा ठिकाणी परवानगी घेऊन शांततेच्या मार्गाने आंदोलने केल्यास ही समस्याच निर्माण नाही. झुंडशाहीला राजकीय पक्षांनी प्रोत्साहन द्यायचे की नाही, हा मुद्दा आहे. या झुंडशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वसामान्यांच्या संमतीनेच शासनाने पोलिसांना कारवाईचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे कोणीही उठून पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करू नये. ■

(माजी पोलिस महासंचालक)

दखल

'निश्चित अवधी रोजगार'–

# असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी वरदान

विश्राम श. देशपांडे

भारतातील श्रमिक क्षेत्र संघटित आणि असंघटित असे विभाजलेले आहे. संघटित क्षेत्रातील कामगार यांना त्यांच्या संख्याबळामुळे संघटित होता येते. त्यांना त्यांच्या स्वतःच्या किंवा कोणत्याही श्रमिक सांघटनेच्या पाठबळामुळे ते सामुदायिक सौदेबाजी करून स्वतःचे सेवेस शर्ती आणि सोयी सुविधा खूप चांगल्याप्रमाणे प्राप्त करून घेऊ शकतात . या उलट असंघटित क्षेत्रातील कामगारांची आस्थापनेतील संख्या जास्त नसते, ते संघटित होऊ शकत नाहीत, त्यांना संघटनेचे पाठबळ नसते. त्यांना रोजगाराची शास्वती नसते. त्यांना अल्प वेतन असते, त्यांना सुट्टी, सामाजिक सुरक्षा मिळत नाही. या क्षेत्रामध्ये स्वीग्गी, झोमॅटो, ओला, उबेर इत्यादी ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे काम करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो. या असंघटित क्षेत्रामध्ये सुमारे ९३ टक्के कामगार वर्ग कार्यरत आहे.

केंद्र शासनाने २९ विविध कामगार अधिनियमाचे ४ संहितांमध्ये रूपांतर केले आहे. औद्योगिक संबंध संहिता, या संहितेमध्ये एक असून यामध्ये 'निश्चित अवधी रोजगार' (नि.अ.रो.) ही संकल्पना मांडली आहे. भारतात ही संकल्पना प्रथमच नव्याने लागू करण्यात आली आहे. औद्योगिक संबंध संहिता २०२० मधील



कलम २ उप कलम (०) मधील 'निश्चित अवधी रोजगार' ही संकल्पना सर्व व्यवसायांकरिता लागू करण्यात अली आहे. 'निश्चित अवधी रोजगार' ही संकल्पना असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी वरदान ठरेल.

प्रथमदर्शनी ही तरतूद कामगारविरोधी आणि जाचक वाटते. देशातील जवळपास सर्वच कामगार संघटनांचा याला विरोध आहे. कामगार संघटनांच्या मते, या तरतुदीमुळे स्थायी (नियमित) स्वरूपाच्या नोकऱ्या संपुष्टात येतील. पर्यायाने कामगारांची संघटनशक्ती कमी होईल आणि त्यांची सामूहिक सौदेबाजी क्षमता कमी होईल. त्यामुळे त्यांचे अधिक शोषण होईल आणि व्यावसायिकांची 'मर्जीनुसार कामावर ठेवा आणि आवश्यकता नसेल तर काढा' ही वृत्ती पुन्हा बळावेल. कामगाराच्या जीवनात कायम रोजगाराची अनिश्चितता राहील, स्थायी रोजगार नसल्याने त्याला कोणते कर्ज मिळणार नाही, त्याची समाजात पत उरणार नाही, तो सदैव व्यावसायिकांवर अवलंबून राहील.

खरे तर यातील कामगार संघटनेच्या काही शंका निराधार आहेत. निश्चित अवधी रोजगार या तत्त्वावर काम करणारे कामगार यांना स्थायी (नियमित) कामगाराप्रमाणे सर्व सोयी व सुविधा देणे संहितेमध्ये बंधनकारक केले आहे. त्यांना स्थायी कामगाराप्रमाणे वेतन आणि सवलती देणे, तसेच लागू असलेल्या सामाजिक सुरक्षिततेच्या योजना त्यांना लागू करणे बंधनकारक आहे. नि. अ. रो. कामगारांचे अभिलेख ठेवले जातील, त्यांची नोंद भविष्य निर्वाह निधी आणि राज्य कामगार विमा येथे असणार आहे. त्यांच्या वेतनातून अनाधिकृत कपात होणार नाही. त्यांच्या कामाच्या तासाचे व सुट्टी याचे नियमन हाईल. ते कामगार संघटनेचे सभासद होऊ शकतात, (पदाधिकारी नाही). ते कामगार संघटनेच्या निवडणुकीमध्ये मतदार म्हणून सहभागी होऊ शकतात, मतदान करू शकतात. तसेच कोणत्याही आस्थापनेची एकूण कामगार संख्येची गणना करताना त्यामध्ये नि. अ. रो. तत्त्वावरील कामगारांची समावेश होईल. मात्र तोटा एवढाच आहे की कामगारांना त्यांना सेवेत कायम करावे ही मागणी करता येणार नाही आणि न्यायालयाच्या क्षेत्राधिकार अंतर्गत सुद्धा ही बाब येणार नाही.

या विपरीत सध्या प्रचलित असलेल्या कंत्राटी व इतर पद्धतीमुळे कामगारांना वरीलप्रमाणे कोणतेही संरक्षण मिळत नाही. ठेकेदाराकडून फसवणूक आणि शोषण होते ही वस्तुस्थिती आहे. या असंघटित कामगारांना नियमित कामगाराप्रमाणे सेवा शर्ती आणि सामाजिक सुरक्षा मिळवून देणारी नि. अ. रो. ही संकल्पना एक वरदान आहे.

सद्यःस्थितीत केंद्र किंवा राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप नियमांमध्ये नि. अ. रो.बाबत काही नियम नाहीत. त्यामुळे ही संकल्पना यथायोग्य न राबवली गेल्यास त्याची झळ असंघटित क्षेत्रातील कामगारांना बसेल हे निश्चित आहे. परंतु केंद्र किंवा राज्य शासनाने नि. अ. रो. याचे नियम काळजीपूर्वक आणि व्यवसाय/ उद्योगनिहाय केल्यास ते असंघटित कामगारांसाठी वरदान ठरू शकेल.

नवीन उद्योगांकरिता नि. अ. रो.बाबत स्वतंत्र धोरण असावे. नव्याने कार्यरत झालेल्या उद्योगाला पहिले ६ वर्ष किंवा त्यांच्या व्यवहार्यता अहवालाप्रमाणे ब्रेक-इव्हन पॉइंट यापैकी जे आधी घडेल या कालावधीकरिता १०० टक्के कामगार /कर्मचारी नि.अ.रो. या तत्त्वावर घेण्याची मुभा असावी. मात्र हा कालावधी संपल्यानंतर एकूण कामगार/कर्मचारी संख्येच्या ६० टक्के कामगार/ कर्मचारी स्थायी (नियमित) करण्यात यावे, उर्वरित ४० टक्के (ज्यांचा सेवा करार पुढील सहा वर्षांकरिता वाढवण्यात येईल) पैकी १५ टक्के हे पुढील ६ वर्षांत कायम करण्यात येतील आणि उर्वरित २५ टक्के कामगार संख्या ही नि.अ.रो तत्त्वावर ठेवता येईल अशी मुभा असावी. जेणेकरून नवीन उद्योगांना नोकर भरतीमध्ये लवचीकता मिळेल आणि कामगारांना सुद्धा स्थायित्व मिळेल.

सध्या कार्यरत असलेले उद्योग व्यवसाय, माहिती आणि तंत्रज्ञान आस्थापना, शासकीय आणि निमशासकीय संस्था, मंडळे, महामंडळे, स्थनिक स्वराज्य संस्था, इत्यादींमध्ये निश्चित अवधी रोजगाराचा करार कालावधी हा प्रथम नियुक्तीच्या वेळेस २ वर्ष असावा आणि त्यानंतरचा प्रत्येक करार किमान १० वर्षांच्या कालावधीचा असावा. नियुक्तीच्या नंतरच्या कालावधी हा अल्प (२ वर्ष) आहे याचे कारण म्हणजे नियुक्त उमेदवार योग्य आहे का, हे समजण्यासाठी किमान कालावधी आवश्यक असतो. मात्र कामगारांना रोजगाराची शाश्वती असावी म्हणून त्यानंतरचे करार हे दीर्घ मुदतीच्या कालावधीचे असावे.

बांधकाम प्रकल्प, निश्चित अवधीच्या योजना इत्यादी प्रकल्प असेल येथे नियुक्त कर्मचारी / कामगार हे संपूर्ण प्रकल्पामध्ये त्यांच्या कामाचा कालावधी जेवढा आहे तेवढ्या कालावधीपुरते नि.अ.रो करार तत्त्वावर असतील. हंगामी स्वरूपाच्या उद्योगांकरिता करार तत्त्वावरील कर्मचारी/कामगार यांचा कालावधी संपूर्ण हंगाम कालावधीकरिता असावा. निर्यात केंद्रित कारखाने/ आस्थापना किंवा कोणत्याही कारखान्यास किंवा उद्योगास कोणत्याही कारणास्तव मागणी वाढल्यामुळे वाढीव उत्पादनाकरिता आवश्यकतेनुसार तेवढ्या कालावधीकरिता करार करता येईल. हा करार कालावधी एकावेळी ३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा नसावा. मात्र सातत्याने समर्थन नसताना नि.अ.रो. तत्त्वावर अशाप्रकारे कामगार ठेवता येणार नाही.

शासकीय संस्थांमध्ये नि.अ.रो संकल्पना लागू करावी आणि त्याकरिता महाराष्ट्र नागरिक सेवा नियमामध्ये सुधारणा केली पाहिजे. मात्र नि.अ.रो अन्वये नेमलेले अधिकारी/कर्मचारी/कामगार यांच्या सेवा सेवाशर्तींचे नियमन कामगार संहितेनुसार होईल अशी सुधारणा महाराष्ट्र नागरिक सेवा नियमामध्ये करणे आवश्यक आहे. नि.अ.रो. ही संकल्पना व्यावसायिकांना लवचीकता देणारी आहे. त्यामुळे व्यावसायिकांनी पण सामाजिक दृष्टिकोन ठेवून थोडी आर्थिक कळ सोसली पाहिजे. कामगारांना या पद्धतीमुळे कायमस्वरूपी रोजगाराची शाश्वती नसल्याने त्यांना विस्थापन भत्ता या नावाने भरपाईच्या स्वरूपात विशेष भत्ता मिळणे आवश्यक आहे.

विस्थापन भत्ता दर वर्षाला नि.अ.रो. तत्त्वावरील कामगारास देय झालेले एकूण वार्षिक वेतनाच्या १० टक्के ते ७ टक्के इतका असावा आणि तो करार संपुष्टात येईल तेव्हा एकत्रितपणे विस्थापन भत्ता म्हणून देण्यात येईल. मात्र जर नि.अ.रो. तत्त्वावरील कामगारास नियमित केल्यास किंवा त्याचा करार पुन्हा तेवढ्याच कालावधीकरिता वाढ केल्यास हा भत्ता पूर्वीच्या करार कालावधीकरिता अनुज्ञेय राहणार नाही. करार कालावधी कमी वर्षांकरिता वाढविल्यास हा विस्थापित भत्ता त्या अनुषंगाने राहील.

निश्चित अवधी रोजगार ही काळाची गरज आहे. केंद्र शासनाने कामगार संहितेमध्ये या संकल्पनेचा समावेश करून मोठे धाडस दाखवले आहे. परंतु आता केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने औद्योगिक संबंध संहिता २०२० अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारूप नियमांमध्ये त्या बाबतचे नियमन केल्यास त्याचा फायदा असंघटित क्षेत्रातील कामगार आणि खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकसंख्येचा आधार होईल. ■

(भूतपूर्व संचालक, ना. मे. लो. महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था तथा अप्पर कामगार आयुक्त, सध्या यशदा येथे प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत.)

रविवारची पत्रे

## पुनर्विकास पारदर्शकतेचा असावा

नागपुरात जुन्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या (अपार्टमेंट-सोसायट्यांच्या) पुनर्विकासाला वेग आला आहे. पुनर्विकासामुळे अधिक सुरक्षित इमारती, उत्तम पायाभूत सुविधा, आधुनिक सोयी-सुविधा आणि हजारो कुटुंबांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याची मोठी संधी उपलब्ध होते. मात्र, ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकता, निष्पक्षता आणि सुजाण निर्णयप्रक्रियेवर आधारित असली पाहिजे; कोणत्याही प्रकारच्या प्रभाव, दबाव किंवा स्वार्थी हितसंबंधांवर नव्हे. पुनर्विकास प्रकल्प हे अनेक कोटी रुपयांच्या गुंतवणुकीशी संबंधित असतात. अशा मोठ्या आर्थिक व्यवहारांमध्ये विकासकाची निवड गुणवत्ता आणि पात्रतेपेक्षा इतर घटकांच्या प्रभावाखाली होण्याचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्थेने अधिक सतर्क राहून प्रत्येक निर्णय वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि सर्व सदस्यांच्या हिताचा होईल, याची काळजी घेणे आवश्यक आहे. पुनर्विकास प्रक्रियेत एक वाढती चिंता म्हणजे मतदान किंवा निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्न. संपूर्ण सोसायटीसमोर सर्व प्रस्ताव समान पद्धतीने मांडण्याऐवजी काही वेळा वैयक्तिक स्तरावर सदस्यांशी संपर्क साधून विविध आश्वासने, प्रलोभने किंवा विशेष लाभ देण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. प्रत्येक सदनिकाधारकाला विकासकाची आर्थिक क्षमता, पूर्वीचे प्रकल्प, कायदेशीर संरक्षण, प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत, बांधकामाचा दर्जा, पुनर्वसनाच्या अटी आणि करारातील तरतुदी यांची सविस्तर माहिती जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. प्रश्न विचारणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे; तर जबाबदार मालक म्हणून आपले कर्तव्य पार पाडणे होय. बहुसंख्य कुटुंबांसाठी स्वतःचे घर ही आयुष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक असते. त्यामुळे पुनर्विकासाशी संबंधित प्रत्येक निर्णयाचे आर्थिक, कायदेशीर आणि भावनिक परिणाम दीर्घकालीन असतात. प्रत्येक सदस्याला सर्व प्रस्तावांचा अभ्यास करण्यासाठी, विविध विकासकांच्या ऑफर्सची तुलना करण्यासाठी, स्वतंत्र कायदेशीर व तांत्रिक सल्ला घेण्यासाठी आणि सखोल चर्चेत सहभागी होण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. सुजाण संमती हा न्याय्य आणि पारदर्शक पुनर्विकासाचा मूलभूत पाया आहे. महाराष्ट्रात वाढत्या पुनर्विकास प्रकल्पांच्या पृष्ठभूमीवर राज्य शासन आणि सहकार विभागाने सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी सर्वसमावेशक पुनर्विकास धोरण तयार करण्याचा गांभीर्याने विचार करावा. पुनर्विकास अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी खालील उपाय आवश्यक आहेत :

सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्पष्ट व एकसमान पुनर्विकास धोरण. सर्व विकासकांसाठी समान मूल्यांकन निकष. प्रत्येक प्रस्ताव, आर्थिक अटी आणि कराराची संपूर्ण माहिती सर्व सदस्यांना उपलब्ध करून देणे. संस्थेमार्फत स्वतंत्र कायदेशीर, तांत्रिक आणि आर्थिक सल्लागारांची नियुक्ती. स्वतंत्र यंत्रणेच्या देखरेखीखाली गुप्त मतदानाची व्यवस्था. दबाव, धमकी किंवा निर्णयप्रक्रियेवर अनुचित प्रभाव टाकण्याच्या सिद्ध झालेल्या प्रकारांवर कठोर कायदेशीर कारवाई. पुनर्विकास प्रक्रिया न्याय्य, पारदर्शक आणि कायदेशीर राहावी यासाठी सहकार विभागाकडून अधिक प्रभावी देखरेख. बहुसंख्य विकासक व्यावसायिक प्रामाणिकपणाने काम करतात आणि दिलेली आश्वासने पूर्ण करतात. शहराच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे आणि त्याचे स्वागतच केले पाहिजे. पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित निवड प्रक्रिया प्रामाणिक विकासकांच्याही हिताची असते. त्यामुळे प्रकल्प गुणवत्ता, विश्वासार्हता आणि क्षमतेच्या आधारे मिळतात, प्रभाव किंवा वैयक्तिक संबंधांच्या आधारे नव्हे. यामुळे पुनर्विकास क्षेत्राविषयी समाजाचा विश्वास अधिक दृढ होतो.

**रोहित मारपकवार**/९४२२४४४३७७

■■

## राईस प्लेट

१९८२ सालातली गोष्ट आहे. आम्ही त्यावेळी एका खेड्यात राहत होतो. माझ्या सासऱ्यांच्या डोळ्याचं ऑपरेशन करायचं ठरलं म्हणून मी सहा वर्षांचा मुलगा व दोन वर्षांची मुलगी यांना घेऊन अमरावतीला जाणाऱ्या बसमध्ये बसले. या प्रवासात दोन गावं सोडले की एका नदीच्या पुलावरून बस जात असे. नदी तशी उथळ. फारसं पाणी नसायचं. ऑगस्ट महिना होता. दोन दिवसांपासून धुवांधार पाऊस सुरू होता. धरणातून पाणी सोडलं होतं. त्यामुळे नदीवरच्या पुलावरून वेगात पुराचं पाणी वाहत होतं. बस पुलावरून जाणं अशक्य होतं. पूर ओसरण्यास तीन तास लागणार होते. संध्याकाळी ६ वाजता निघालेली बस ७ वाजता रस्त्याच्या कडेला उभी करण्यात आली. साडेआठ वाजता माझ्या दोन वर्षांच्या मुलीला भूक लागली. अडीच-तीन तासांतच खरं तर अमरावतीला पोहोचलो असतो एरवी, म्हणून निघताना मुलांसाठी पोळी-भाजी वगैरे काही सोबत घेतलं नव्हतं. आम्ही राहत होतो ते खेडं इतकं लहान होतं की, फक्त आठवडी बाजार भरायचा तेव्हाच बिस्किटं विकत मिळायची. त्यामुळे सोबत तीही घेता आली नाहीत. थोडा मुरमुऱ्याचा चिवडा घेतला होता; तो संपून गेला. कंडक्टरला सांगून आजूबाजूला कोणाचं घर दिसते का शोधू लागले. अंधार असल्याने तसं फारसं दिसत नव्हतं. थोडं चालत गेल्यावर एका झोपडीतून थोडा अंधूक उजेड दिसला. मुलगी आता भुकेने व्याकूळ झाली होती. मुलालाही भूक लागली होती. हिंमत करून झोपडीत शिरले. झोपडीतल्या बाईला काही अन्न असेल तर विचारले. खरं म्हणजे जवळ पाच हजार रुपये होते. सासऱ्यांच्या ऑपरेशन व औषधांसाठी घेतलेले. पण एकही दुकान आसपास नसल्याने अक्षरशः झोपडीत अन्न मागण्याची वेळ आली होती. झोपडीतल्या बाईजवळ अगदी दोन वाट्या तांदूळ होते. शेतावरचे मजूर होते ते. दोघं नवराबायको आणि दहा वर्षांचा एक मुलगा, एवढे जणं झोपडीत राहत होते. सगळी परिस्थिती कळल्यावर बाई त्या दोन वाट्या तांदळाचा भात शिजवून द्यायला तयार झाली. तिने चूलही पेटवली. भात शिजत आला तसा बाईच्या नवऱ्याला व्यवहार आठवला. म्हणाला, ''या भाताचे पैसे पडतील म्याडम!'' म्हटलं, ''देईन.'' वाटलं, असे किती पैसे मागणार? फार तर शंभर रुपये, दोनशे रुपये! मुलांनी तो गरम गरम भात नुसतं मीठ कालवून खाल्ला. आता रात्रीचे ९ वाजले होते. पुराचं पाणी ओसरायला लागलं होतं. अर्ध्या तासात रस्ता मोकळा होईल, असं कंडक्टर येऊन सांगून गेला. मी बाईच्या नवऱ्याला दीडशे रुपये दिले. तो म्हणाला, ''हे एवढेच?'' म्हटलं, ''तुम्ही सांगा, किती द्यायचे?''

''माझा मुलगा शहरातल्या साळंत रोज पैदल जातोया. त्याला साळंत जायला साईकील पायजे हाय. साईकीलची किंमत दोन हजार आन ऐंशी रुपये हाय. त्येवडे द्या.'' त्याची मागणी ऐकून मी हबकलेच. मनात आलं, एवढ्या भाताची किंमत इतकी! पण लगेच वाटलं, अत्यंत गरीब असूनही त्यांचं उद्याचं जेवण त्यांनी माझ्या मुलांना खाऊ घातलं आहे. मला त्यांचं हे ऋण फेडणं आवश्यक आहे. मी त्यांना पैसे दिले. अर्थात ऑपरेशन व औषधांच्या पैशांची सोय अमरावतीला पोहोचल्यानंतर अन्य ठिकाणाहून केली. जगातल्या कुठल्याही महागड्या फाईव्ह स्टार हॉटेलातल्या एखाद्या डीशपेक्षा ही 'राईस प्लेट - रुपये दोन हजार ऐंशी' कितीतरी अमूल्य होती!

**आरती देशपांडे**/पुणे, ९४०३५८०००६

■■

## 'तरुण भारत'चे अभिनंदन...

सर्वप्रथम मला 'तरुण भारत'चे अभिनंदन करायचे आहे ते अशासाठी की दिल्लीत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाबाबत, इतर वर्तमानपत्रांच्या तुलनेत, सत्य परिस्थिती मांडणाऱ्या बातम्या, सडेतोड अग्रलेख आणि रोखठोक विविध लेखांमधून, आंदोलनाची सर्वाधिक सत्य परिस्थिती सांगणारे, आंदोलनाची कारणमीमांसा करणारे, 'तरुण भारत' हे महाराष्ट्रातील एकमेव दैनिक असल्याचे दिसून आले आहे. त्याबद्दल 'तरुण भारत'चे अभिनंदन!

२५ जुलैच्या तरुण भारतमधील अग्रलेख याचे उत्तम उदाहरण आहे. आंदोलनाचा सर्वाधिक परिचित चेहरा असलेल्या सोनम वांगचुक यांनी सव्वीस दिवस उपोषण केले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, त्यांची प्रकृती अधिक ढासळू नये, यासाठी सरकारने त्यांना रुग्णालयात उपचार घेण्यासाठी दाखल केले. यादरम्यान त्यांच्या सरकारबरोबर सकारात्मक चर्चाही झाल्या. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा ही मागणी सोडून सोनम वांगचुक यांनीही समजूतदारपणा दाखवला. त्यांच्या इतर सगळ्या मागण्या सरकारने मान्य केल्यामुळे त्यांनी आपले उपोषण सोडले. दुसरीकडे सरकारने विद्यार्थी प्रतिनिधींशीही चर्चा सुरू केली आहे. कोणत्याही परीक्षेचे पेपर कधीही लीक होऊ नयेत यासाठी सरकारने कठोर निर्णय घेतले आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठीची प्रक्रियाही सुरू झाली आहे.

असे असताना अभिजित दीपकेने पुढील आंदोलन स्वतः होऊन स्थगित करायला हवे होते. तसे न करता त्याने खुद्द सोनम वांगचुक यांच्यावरच सरकारशी सौदेबाजी केल्याचा आरोप संतापजनक आहे. इथून पुढेही हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे आणि देशभरात हे आंदोलन उभे करण्याची धमकी त्याने दिली आहे. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राजीनाम्याची मागणी करू अशी दर्पोक्तीही त्याने केली आहे. यावरून दीपकेला पेपर लीक होणे रोखण्यात किती रस आहे हे लक्षात येते.

सरकार विरोधात अन्य कोणताही मुद्दा नसल्यामुळे हे आंदोलन विरोधी पक्षांच्या नेत्यांनी हायजॅक केले आहे. संसदेत चर्चा करण्यास नकार देणाऱ्या आणि हंगामा करून अधिवेशन पाण्यात घालणाऱ्या विरोधी पक्षांबाबत देशातील जनतेमध्ये प्रचंड संताप आहे. त्याबरोबर देशविरोधी शक्तींसह गुंड-गुन्हेगार या आंदोलनात घुसल्यामुळे त्याचे गांभीर्यही वाढले आहे. यामुळे प्रक्षोभक वक्तव्ये करून हिंसा भडकवणाऱ्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना सरकारने चाप लावला पाहिजे. तसेच आंदोलनात हिंसाचार करणाऱ्या, पोलिसांच्या जीवावर उठणाऱ्या, महिलांचा विनयभंग करणाऱ्या आणि देशात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कायमचा धडा बसेल अशी कडक कायदेशीर कारवाई सरकारने करावी.

नीट परीक्षा पेपर लीक झाल्यानंतर सरकारने परीक्षा रद्द केली आणि नंतर पुन्हा परीक्षा घेऊन त्याचा निकालही लागला आहे. त्याचबरोबर या अपराधात सामील असलेल्या ४७ सरकारी अधिकाऱ्यांना नोकरीतून काढून टाकले आहे. आरोपींवरील सुनावणीसाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करण्याची घोषणाही केली आहे. एवढे सगळे करूनही शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी घेऊन मंत्रिपदाचा राजीनामाही दिला आहे. तेव्हा आता सीजेपीने देशभरातील आपले आंदोलन त्वरित मागे घेऊन विद्यार्थी प्रतिनिधींनी सरकारबरोबर सहकार्य करावे आणि पेपर लीक प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी मदतही करावी. मात्र या राजीनाम्याचे राजकारण न करता, कोणीही देशात हिंसाचार करून, अराजकता निर्माण करून सरकारला ब्लॅक मेल करण्याचा पायंडा पडणार नाही याबद्दलही सरकारला विचार करावा लागेल, यातही शंका नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

■■

## पश्चिम घाटाचे संवर्धन होणे आवश्यक

देशातील पश्चिम घाटाला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील घोषित करण्याच्या केंद्र सरकारच्या मसुद्याला सहा राज्यांनी कडाडून विरोध केला आहे. भारताच्या पश्चिम किनारपट्टीला लागून असलेली पर्वतरांग म्हणजेच पश्चिम घाट. हिमालयानंतर देशात सर्वाधिक प्रसिद्ध असलेला पश्चिम घाट हा त्याच्या नैसर्गिक परिसंस्थेसाठी ओळखला जातो. पश्चिम घाटात लोकसंख्येची घनता हिमालयापेक्षा अधिक आहे. ज्या ज्या राज्यांमधून पश्चिम घाट जातो त्या राज्यांसाठी ते एक आर्थिक संकटदेखील झाले आहे. या प्रदेशात प्रामुख्याने नगदी पिके घेण्याचे प्रमाण अधिक आहे. पश्चिम घाटाला कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित करण्यासाठी त्याचे संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी प्रयत्न केला जात आहे. परंतु, राज्य सरकारांनी याबाबत काही आक्षेप आणि चिंता व्यक्त केल्या आहेत

महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या सहा राज्यांना पश्चिम घाट लागला आहे. दिवंगत पर्यावरण शास्त्रज्ञ माधव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखालील समितीने पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी विशेष शिफारशी केल्या होत्या. त्यानंतर इस्रोचे माजी प्रमुख के कस्तुरीरंगन त्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय कार्यसमिती स्थापन झाली होती. या दोन्ही समित्यांनी केलेल्या अभ्यासानुसार पश्चिम घाटातील छपन्न हजार आठशे पंचवीस किलोमीटर क्षेत्राला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला देण्यात आला होता. त्यासाठी केंद्र सरकारने अधिसूचनेचा मसुदा जारी केला असता संबंधित राज्यांकडून सहमती येऊ शकली नाही. परिणामी राज्यांनी नोंदवलेले आक्षेप व व्यक्त केलेल्या चिंतेचा अभ्यास करण्यासाठी आणखी एक तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. पश्चिम घाट बाष्पमुक्त वाऱ्यांना अडवून एक नैसर्गिक दूत म्हणून काम करतो आणि मान्सूनवर प्रभाव पडतो. यामुळे घाटांच्या किनारपट्टीच्या भागात मुसळधार पाऊस पडतो. हा मुबलक पाऊस आणि दाट जंगले येथील झऱ्यांना जिवंत ठेवतात. तसेच या भागातील गोदावरी, कृष्णा, कावेरी, पेरियार आणि इतर अनेक नद्यांना जीवन देतात. म्हणूनच संपूर्ण देशासाठी पश्चिम घाटाचे महत्त्व अधिक आहे. तसेच पश्चिम घाट हा अतिसंवेदनशील देखील आहे. ■

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र **मालक, सोलापूर तरुण भारत मिडीया लिमिटेड** करिता, **मुद्रक, प्रकाशक** कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत प्लॉट नं. ए- ३२ छत्रपती संभाजीनगर, इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद ४३१००५ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. **संपादक** : विजयकुमार माधवराव पिसे. / **कार्यकारी संपादक** : प्रशांत वसंतराव माने

E-mail - stbaurangabad@gmail.com, Mob : 8888847268

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, published by MR.KULBHUSHANRAM RAMAKRISHNA TARE Printed at CHATRAPATI SAMBHAJINAGAR INDUSTRIAL CO OP SOCIETY, CHATRAPATI SAMBHAJINAGAR 431005.(Maharashtra) **Editor :** Mr.VIJAYKUMAR MADHAVRAO PISE. / **Exicutive Editor** : Mr. PRASHANT VASANTRAO MANE. E-mail : stbaurangabad@gmail.com Mobile : 8888847268.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : येथील द प्राईड इंडिया स्पर्श संचलित समग्र विहान काळजी व आधार केंद्रातर्फे एनएमपी प्लस यांच्या मार्गदर्शनाखाली -ठढ उपचारावर सातत्याने असलेल्या एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींसाठी दिनांक २५/०७/२०२६ रोजी विहान काळजी व आधार केंद्रात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. अमरनाथ आवरगावकर आणि डॉ. अजय मुंडे यांनी उपस्थित लाभार्थींच्या डोळ्यांची तपासणी करून आवश्यक ते वैद्यकीय मार्गदर्शन केले.

या शिबिराचा उद्देश एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींमधील दृष्टीदोष व इतर नेत्रविकारांचे वेळेवर निदान करून त्यांना पुढील उपचारासाठी आवश्यक मदत उपलब्ध करून देणे तसेच गरजेनुसार शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करणे हा होता.

तपासणीदरम्यान ज्या लाभार्थींना पुढील उपचार किंवा शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले, त्यांना पुढील उपचारांसाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे संदर्भित करण्यात आले.

शिबिरास लाभार्थींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशा प्रकारच्या आरोग्यविषयक आधार देणाऱ्या उपक्रमांची समाजात मोठी गरज असल्याची भावना लाभार्थींनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नेत्ररोगतज्ज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विविध वृत्त.....

## आषाढी एकादशीनिमित्त मुरूड येथे विविध कार्यक्रम

तभा वृत्तसेवा

मुरूड दि. २६ जुलै : आषाढी एकादशीनिमित्त मुरुड येथे सर्वधर्मीय वारी सोहळा पार पडला. यात अनेक सामाजिक संस्था, राजकीय मंडळी व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. त्यानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे वा-रकरी यांनी विठ्ठल-रुक्माई यांच्या पालखीचा संपूर्ण गावभर प्रदक्षिणा घालून हे वारकरी पायी दिंडी काढून विठ्ठल मंदिरात पोहोचले. यावेळी काही सामाजिक संस्था, व्यापाऱ्यांनी खिचडी, केळी, राजगिऱ्याचे लाडू वाटप केले. पंचायत समिती सदस्य पंकज गायकवाड यांनी संविधान चौक या ठिकाणी दिंडीत येणाऱ्या वारकऱ्यास स्वागत करून त्यांना केळी वाटप केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकातदेखील वेगवेगळे स्टॉल यामध्ये केळी आणि साबुदाणा खिचडी वाटण्यात आली. एसटी स्टँड या ठिकाणी विठ्ठलाची प्रतिमा स्थापन करून एसटी स्टँडमध्ये येणाऱ्या प्रवाशांना तसेच एसटी चालक, वाहक यांना फराळाचे वितरण करण्यात आले. या वारकरी दिंडीमध्ये पोद्दार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल व छत्रपती शाहू इंग्लिश स्कूल यांनी सहभाग नोंदविला होता. या दोन्ही शाळेने वेगवेगळे कलागुणचे सादरीकरण केले.

## विविध कारणांनी आस्थापनांना ९४ हजार रुपयांचा दंड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणे, सिंगल युज प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर, अनधिकृत बॅनर लावणे, अतिक्रमणे करणे यासह विविध कारणांसाठी लातूर श-हर महानगरपालिकेच्या वतीने विविध आस्थापनांना ९४ हजार ६०० रुपयांचा दंड करण्यात आला.

लातूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी मनपा प्रयत्नशील आहे. परंतु अनेकदा व्यावसायिक व व्यापाऱ्यांकडून अस्वच्छता केली जाते. अशा व्यापारी, व्यावसायिक व आस्थापनांना सूचना देऊन त्यानंतरही फरक नं पडल्यास कारवाई करण्याचे आदेश मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी, उपायुक्त वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांनी दिलेले होते.

त्यानुसार मनपाच्या स्वच्छता विभागाने छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबाजोगाई रोड, औसा रोड, गांधी चौक, गंजगोलाई, राजीव गांधी चौक, छत्रपती राजर्षी शा-हू महाराज चौक, कव्हा नाका, पु. अहिल्यादेवी होळकर चौक, आंबा हनुमान, स्वामी विवेकानंद चौक या परिसरात दंडात्मक कार्यवाही केली. एकूण ९४ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. 'ए' झोनमध्ये १३ हजार रुपये, 'बी' झोन मध्ये २९ हजार रुपये, 'सी' झोनमध्ये १५ हजार रुपये व 'डी' झोन मध्ये ३७हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, धोंडीराम सोनवणे, अमजद शेख यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त दिंडी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : श्री छत्रपती शिवाजी विद्यालय मळवटी ता. लातूर येथे आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची दिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी विठ्ठल व रुक्मिणी यांच्या वेशभूषेमध्ये टाळ मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा माऊली तुकाराम गजरात विद्यार्थी व विद्यार्थिनी सर्व संत व वारकरी वेशभूषा मध्ये दिंडीमध्ये सहभागी झाले होते.

या दिंडीमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक युवराज शिंदे, जाकरअली सय्यद, श्रीकृष्ण पवार, वैभवी पवार, विलास गिरी, मंजुषा शिंदे, मोनिका वंजारे, चंद्रकांत चोपले, मधुकर गरड, बिटाजी भोसले व विद्यार्थी सहभागी झाले होते.

# औशात २९ लाखांचा गुटखा पकडला, तेलंगणातील दोघेजण गजाआड



तभा वृत्तसेवा

औसा दि. २६ जुलै : महाराष्ट्रात प्रतिबंध असलेली सुगंधीत तंबाखू व गुटखाची वाहतूक करणारा तेलंगणातील आयशर टेम्पो शनिवार दि. २५ रोजी पहाटे ४ व.१० वा. सुमारास लातूरच्या गुन्हा अन्वेषण विभागाने पकडला आहे.या प्रकरणी तेलंगणातील दोघांना पकडून त्यांच्याविरुद्ध असा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी तंबाखूची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणारा टेम्पो मधील २८ लाख ९७ हजार ६० रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा लातूर जिल्ह्यात अवैध धंदे, प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. शनिवार दि. २५ रोजी पहाटे ४.१० वा. लामजना ते तुळजापूर टी पॉईंट मार्गे आयशर टेम्पो क्र. टीएस१२ यूई ४१९० मधून सुगंधीत तंबाखू व गुटखा विक्री साठी जात होता. पोलिसांनी या वाहन चालकाने चौकशी केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी या वाहनांची झडती घेतली असता टेम्पो मध्ये एस एम ५०० ग्राम सुगंधित तंबाखू ची ३५ पोती १७ लाख ४९ हजार ५००रूपये, बाबा ब्लॅक सुगंधी तंबाखू ५पोती ४लाख १५ हजार ८६० रूपये,एम एस सुगंधित तंबाखू ची दोन पोती ९९हजार ५०० रूपये,बाबा ब्लॅक तंबाखू ५ पोती ५लाख ५५हजार ,राजरत्न किमामचे २ बॉक्स ७७हजार २००रूपये असा २८ लाख ९७ हजार ६०० रूपये व टेम्पो ११लाख ५0हजार रूपये असा ४० लाख ४७हजार६0रूपये किमतीचा माल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी मोहम्मद शेरु मोहमद सलीम वय २९, रा. आट्टारी, जि. रंगारेड्डी, तेलंगणा व रहीम इस्माईल शेख वय २६, रा. अर्श महाल, किशनबाग बहादुरा, जि. हैदराबाद, तेलंगणा यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन औसा पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे .स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, प्रेमदास राठोड, राजेश कंचे,तुळशीराम बरुरे, पाराजी पुठेवाड व रामदास बाचीफळे यांनी केलेल्या कार्यवाहीचे कौतुक होत आहे.

## बचत गटातील महिलांना शासकीय योजनांचा प्राधान्याने लाभ : जिल्हाधिकारी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : बचत गटातील महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभप्राधान्याने दिला जाईल. बँकांकडून बचत गटांना गरजेनुसार जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड म्हणाले.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) लातूर जिल्हा कार्यालय अंतर्गत स्थापित एकता लोकसंचालित साधन केंद्र, लातूर (पश्चिम) ची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २४ जुलै रोजी भक्ती शक्ती मंगल कार्यालय येथे पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते झाली. याप्रसंगी १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वार्षिक आढावा व नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

महिलांनी कर्जाचा वापर उद्योग व्यवसायासाठी करून विहित वेळेत परत फेड करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले की, बचत गटातील महिलांची बैंक कर्जाची परतफेड ९९.९५ टक्के इतकी असल्याबद्दल त्यांनी महिलांचे कौतुक केले. तसेच लोकसंचालित साधन केंद्र (सीएमआरसी) महिला विकासासाठी चांगले काम करत असल्याचे सांगत, मशरूम व्यवसाय व रेशीम लागवड यांसारख्या शेतीपूरक व शेतीवर आधारित व्यवसायांकडे महिलांनी वळावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात संयुक्त मालकी हक्काबाबत सुमती बिडवे व त्यांच्या टीमने आणि कौटुंबिक हिंसाचाराबाबत बबन हटकर यांनी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांनी केले. या सभेच्या अध्यक्षस्थानी सीएमआरसीच्या अध्यक्षा अश्रिवनी पडिले होत्या, तर सचिव मंगल भालेराव, जयहिंद सीएमआरसीच्या व्यवस्थापक सविता पाटील, सावित्रीबाई फुले सीएमआरसीच्या व्यवस्थापक उषा डूमने, एचडीएफसीचे भरत काळे आणि कार्यकारिणीचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगल वाघचौरे व विजयकुमार स्वामी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वप्नील श्रीगीरी, अनंत हेरकर, प्रवीण जगताप, सतीश गीते व एकता सीएमआरसीच्या टीमने परिश्रम घेतले. व्यवस्थापक सुजाता तोंडारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅकवर नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण करण्याचे बाबासाहेब पाटील यांचे आवाहन



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ जुलै : राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील ५४ हजार ४२६ पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध केल्या जातील, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. सर्व पात्र शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ग्रीस्टॅक'वर नोंदणी करून 'आधार प्रमाणीकरण' प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे.

पहिल्या टप्प्यात २२ जुलै रोजी जाहीर झालेल्या यादीत लातूर जिल्ह्यातील २ गावांमधील १३३ पात्र शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यानंतर आज लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांतील ८९२ गावांमधील ५४ हजार २९३ पात्र शेतकऱ्यांची यादी शेतकरी सभासदांच्या विशिष्ट क्रमांकासहित जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ३५ हजार २३१, तर राष्ट्रीयकृत व खासगी बँकांचे १९ हजार १९५ अशा एकूण ५४ हजार ४२६ पात्र कर्जदार शेतकऱ्यांचा समावेश आहे.

आधार प्रमाणीकरणासाठी पात्र शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे सूचना पाठवल्या जाणार आहेत. याशिवाय ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि संबंधित बँकांच्या शाखांमध्येही लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या जातील. योजनेतील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला एक विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात आला आहे. आधार क्रमांक किंवा या विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक असून, जिल्ह्यातील सुमारे ८८८ आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यादीत नाव असलेल्या सर्व पात्र शेतकरी बांधवांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार कार्ड, कर्ज खाते व बचत खात्याचे पासबुक, यादीत नावापुढे नमूद असलेला विशिष्ट क्रमांक आणि 'ग्रीस्टॅक' नोंदणी या आवश्यक कागदपत्रांसह आपली आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून घ्यावी. ग्रीस्टॅकवरील नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यात 'डीबीटी' प्रणालीद्वारे कर्जमुक्तीची रक्कम जमा केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

सोलापूर तरूण भारत
छोट्या जाहिराती / जाहीर प्रगटन / इतर जाहीराती योग्य दरात छापल्या जातील.
संपर्क : ७३८५५६७०३१

## नियमित कर्जदारांवर अन्याय थांबवा; सर्व शेतकऱ्यांची २ लाखांपर्यंत समान कर्जमाफी करा!

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : राज्यातील थकीत आणि नियमित कर्जदार शेतकऱ्यांमध्ये भेदभाव न करता सर्व पात्र शेतकऱ्यांना समान न्याय देत २ लाखांपर्यंतची कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन सामाजिक कार्यकर्ते सुनील मंदाडे यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्या मार्फत शासनाकडे पाठविण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शेती क्षेत्र आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. मात्र समितीचा अहवाल मंत्रिमंडळासमोर न मांडताच थकीत कर्जदारांसाठी कर्जमाफी आणि नियमित कर्जदारांसाठी मर्यादित प्रोत्साहनपर अनुदान जाहीर करण्यात आले. त्यामुळे नियमित कर्जदार शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

नियमित कर्ज फेडणारा शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम असतो, हा समज चुकीचा असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. अनेक शेतकरी बँकेची पत टिकवण्यासाठी आणि पुढील हंगामात कर्ज मिळावे म्हणून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कर्जाची वेळेत परतफेड करतात. त्यासाठी कमी दरात शेतीमाल विकणे, दागिने गहाण ठेवणे, नातेवाईकांकडून उसनवारी करणे किंवा खासगी सावकारांकडून जास्त व्याजाने पैसे घेणे अशा कठीण परिस्थितीला त्यांना सामोरे जावे लागते.

त्यामुळे थकीत व नियमित कर्जदार असा भेदभाव न करता समान वाटप पद्धतीने सर्व शेतकरी कर्जदारांचे २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर ॲड. उदय गवारे .सुनील मंदाडे आणि ॲड. विजयकुमार जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नूतन शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभारे यांचा राष्ट्रवादी शिक्षक संघातर्फे सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या नुतन शिक्षणाधिकारी म्हणून नुकत्याच रूजू झालेल्या रोहिणी कुंभारे यांचा राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ यांच्या हस्ते रोहिणी कुंभारे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी राष्ट्रवादी शिक्षक संघाचे प्राथमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष मोहन हाके, जिल्हा शिक्षण सचिव डॉ. दयानंद कांबळे, जिल्हा संपर्क प्रमुख काजीम कादरी, शहराध्यक्ष हैबतराव माने, महीला आघाडीच्या जिल्हा कार्याध्यक्षा संगीता आरदवाड, ज्योत्सना पाटील, नितीन मामडगे, दयानंद देवणे, ज्ञानेश्र्वर मोरे, नितीन लिंबाळकर आदीसह राष्ट्रवादी शिक्षक संघाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## तुळजाभवानी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

तभा वृत्तसेवा

लातूर : शहरातील संत ज्ञानेश्वरनगर येथील तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिराने इयत्ता ७वी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत शाळेतील ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. वैष्णवी लक्ष्मण दंडगुले हिने २४२ गुण मिळवून विद्यालयात प्रथम प्रिया निळकंठ चव्हाण हिने २३८ गुणांसह द्वितीय, तर मुबशरा जब्बार शेख हिने २३४ गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. तसेच जागृती राम कांबळे २३०, रुद्र पंडित केंद्रे २२६, ब्रह्मा केशव सन्मुखराव २२६, वरुण अनुरथ कांबळे २२४, अयान सय्यद शेख २२२, आकांक्षा महादेव साळवे २२०, फुरखान फारुक शेख २२० आणि वैष्णवी राम जाधव याने १९८ गुण मिळवत शाळेचा गौरव वाढविला.

## 'मुक्तांगण'च्या चिमुकल्यांचा दिंडी सोहळा





तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ जुलै : मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये चिमुकल्यानी आषाढी एकादशी उत्साहात साजरी केली. प्रथम शाळेच्या आवारात विठ्ठल रुक्मिणीच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

विठ्ठल रुक्मिणी प्रतिमेचे पूजन गजानन कृपा भजनी मंडळाच्या अध्यक्षा छायाताई तोडक र, श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी आषाढी एकादशी विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. यानंतर मुक्तांगणच्या चिमुकल्यांची दिंडी श्री साई मंदिर-ाकडे मार्गस्थ झाली. यावेळी पांडुरंगाची वेशभूषा वेदांत कोलपुके, रुषांक तेले, क्रीशिव कोरे, शंतनू वाडकर, तर रुक्मिणीची वेशभूषा कृष्णिका कलमे, रीयांशी आलमले, विनिषा बेलगावकर, आराध्या खटावकर, शानुक्ता पाटील यांनी साकारली होती.

शाळेचे विद्यार्थी व शिक्षिका यांनी विठ्ठल नामाची शाळा भरली, अवघे गर्जे पंढरपूर, पंढरपुरात काय वाजत गाजत, गेला हरी कुण्या गावा, या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोवला, रुखमाई रुखमाई अशा विविध भजनावर टाळ, मृदंगाच्या निनादात दिंडीचे उत्साहपूर्ण वातावरणात सादरीकरण केले. जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल जय हरी, ज्ञानेश्र्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम अशा विठ्ठल नामाचा गजरात साई मंदिरात दिंडी घेऊन विद्यार्थ्यांनी प्रवेश केला. गजानन कृपा भजनी मंडळाने विठ्ठलाच्या आरतीसह विविध भजन गाऊन विद्यार्थाना प्रोत्हाहीत केले. भजनी मंडळानी साई मंदिरामध्ये गायलेल्या भजनाच्या तालावर विद्यार्थ्यांनी रिंगण खेळून दिंडीचा मनसोक्त आनंद लुटला.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मागोवा

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## आहार-विहार

डॉ. सीमा पांडे/ ९९२२९१९७२०

# संपूर्ण आरोग्यासाठी 'माईंडफुलनेस'

आज सकाळी तुम्ही काय खाल्लंय? आठवतंय का? हे जर तुम्हाला आठवावं लागत असेल तर ही समस्या आहे. आपण जे अन्न खात आहोत त्याकडे आपलं लक्ष असणं आवश्यक आहे. संपूर्ण आरोग्याच्या बाबतीत माईंडफुलनेस अत्यंत महत्वाचा आहे. माध्यमांवरही माईंडफुलनेसवर आज सर्वत्र चर्चा दिसून येते. माईंडफुलनेस अंगिकारण्यासाठी किंवा तो वाढविण्यासाठी काय केले पाहिजे, याचे उपायही सांगितले जातात. आरोग्याच्या सामान्य आणि गंभीर तक्रारी कोणतेही औषध न घेता, माईंडफुलनेस चांगला ठेवून आपण कशा प्रकारे नियंत्रणात आणू शकतो, हे ही सांगितले जाते. पण काही वेळा त्यामध्ये संदिग्धता असल्याने किंवा कधी विश्वासार्हतेचा अभाव असल्याने सामान्य लोकांपर्यंत या गोष्टी पोहोचत नाहीत.

### माईंडफुलनेस म्हणजे काय

माईंडफुलनेस म्हणजे सजगता! वर्तमानाचे भान असणे आणि आपला वर्तमान आहे तसा स्विकारणे! आपल्या आजूबाजूला काय घडतंय याकडे आपलं पूर्ण लक्ष असणे, आपण काय करत आहोत, काय बोलत आहोत, किती आणि कसे जेवत आहोत याबद्दल सजग असणे. उदा. आपण अनेक वर्ष ज्या रस्त्याने ये-जा करत आहोत तो रस्ता आपल्या इतका सवयीचा होतो की कधी असे होते की, आपल्याला एखाद्या दिवशी दुसऱ्या ठिकाणी जायचे असते पण, आपण सवयीने रोजच्या रस्त्याने आपली गाडी नेतो. थोडे अंतर गेल्याबरोबर आपल्या लक्षात येते की, आज आपल्याला दुसरीकडे जायचे होते आणि आपण सवयीने रोजच्या दिशेने निघालो आहोत. याचा अर्थच असा की, आपण विचारांच्या तंद्रीत हरवतो. म्हणजेच आपण वर्तमानात न राहता आपलं मन अचानक भूतकाळात किंवा एखाद्या गोष्टीचा ताण असेल तर काय होईल? असा विचार करून भविष्यात जातो. आपल्या बाबतील कधी असं झालंय का की, रोज आपण तीन पोळ्या खात असू पण, एखाद्या दिवशी आपल्याला तेवढी भूक नाही. तरीही आपण रोजच्या सवयीने किंवा विचारांच्या तंद्रीत अधिक खातो आणि खाल्यावर आपल्याला जाणवतं की आपल्याला हे नको होतं तरी आपण खाल्लं. माईंडफुलनेस म्हणजे आपण जे काही करत आहोत त्याबद्दल सजग राहून योग्य ती कृती करणं आणि आपल्या छोट्या गोष्टींकडेही आपलं पूर्ण लक्ष असणं.

### माईंडफुलनेस म्हणजे काय नाही?

माईंडफुलनेस म्हणजे काय हे लक्षात घेतल्यावर तो कशाला म्हणत नाहीत, हे सुद्धा आपल्याला स्पष्ट असणे आवश्यक आहे. एक सामान्य गैरसमज असा आहे की, माइंडफुलनेस म्हणजे एखादी विशिष्ट अवस्था मिळवण्याचा प्रयत्न करणे जिथे आपण पूर्णपणे शांत असतो, आपल्या मनात कोणतेही विचार नसतात आणि जिथे आपल्याला आनंदी किंवा समाधानी वाटते. माईंडफुलनेस म्हणजे शांत होण्याचा प्रयत्न करणे नाही. माईंडफुलनेस म्हणजे काही निर्माण करणे किंवा काही दूर लोटण्याचा प्रयत्न करणे नाही. तर जे घडत आहे ते जसे आहे तसे स्वीकारणे आणि एखाद्या गोष्टीची जाणीव ठेवणे आणि ती मनापासून स्विकारणे. एक असाही गैरसमज दिसतो की, माईंडफुलनेस म्हणजे निष्क्रिय आणि भावनाशून्य होणे. पण, तसे अजिबात नाही. माईंडफुलनेस म्हणजे परिस्थितीचं भान ठेवून व्यक्त होणे. बहुतांश लोकांच्या मनात सतत भूतकाळ किंवा भविष्याबद्दलचे विचार असतात. त्यामुळे प्रत्यक्षात काय घडत आहे याची जाणीव ठेवण्याची त्यांची मानसिक तयारी नसते. ती मानसिक क्षमता आपल्याला विकसित करावी लागते. आपल्या स्वतःच्या नैसर्गिक माईंडफुलनेसशी जोडलं जाणं आपल्याला शिकावं लागतं. या पद्धतीने मेंदू काम करावा यासाठी सरावाची गरज असते. माईंडफुलनेस ही आपली जन्मजात क्षमता आहे. जरी आपल्या मनाची सवय विचारांमध्ये हरवण्याची असली तरी सजग राहण्याची नैसर्गिक क्षमता आपल्यापैकी प्रत्येकात आहे.



ती ओळखण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. माईंडफुलनेसबद्दल अनेकदा तणाव कमी करण्याच्या दृष्टीने बोलले जाते. पण, तो इतक्यावरच मर्यादित नाही. माईंडफुलनेस आपल्या जीवनाचे कल्याण कसे वाढवू शकतो, हे समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे.

माईंडफुलनेस हा आपल्या नेहमीच्या मनःस्थितीपेक्षा वेगळा आहे कारण, आपण अनेकदा आपल्या विचारांमध्ये हरवलेले असतो. सतत भविष्याची चिंता किंवा भूतकाळाबद्दल पश्चात्ताप करतो. आपण आयुष्याचा मोठा भाग आपण काय अनुभवत आहोत याची जाणीव न ठेवता घालवतो आणि त्यामुळे पाहण्यासारखी दृश्ये, ऐकण्यासारखे आवाज आणि अनुभवण्यासारखा आनंद आपण गमावतो. उदा. जेवण करताना आपलं लक्ष खाण्याकडे नसून, आपण विचारांमध्ये हरवलेले असतो. जेवणाकडे लक्ष न दिल्यामुळे ताटातील अन्नपदार्थांचा आपण आस्वाद घेऊ शकत नाहीत. आपण टीव्ही पाहत किंवा इतर कामे करताना खात असाल तर अशा सवयीमुळे, किती खाल्ले जाते यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असतानाही अपेक्षेपेक्षा जास्त कॅलरी घेतल्या जाऊ शकतात. दुपारचे जेवण किती लक्षपूर्वक घेतले जाते, याचा दिवसभरात नंतर होणाऱ्या खाण्यावर किंवा स्नॅकिंगवरही परिणाम होऊ शकतो. संशोधनांनी सिद्ध केलं आहे की, जेवणाची आठवण जितकी ठळक असते, तितका पोट भरल्याचा अनुभव अधिक काळ टिकतो. कामाच्या ठिकाणी दुपारचे जेवण करताना सोशल मीडियावर स्क्रोल करणे यासारख्या सवयींमुळे आपण नकळत काय आणि किती खातो यावर परिणाम होतो.

ताणतणावाचा आपण काय आणि किती खातो यावर परिणाम होतो. काही लोक ताणतणावात कमी तर काही लोक जास्त खातात. हे पूर्णपणे व्यक्तीवर अवलंबून असते. ताणतणावामुळे आपल्या अन्ननिवडींवरही परिणाम होऊ शकतो. जे लोक अधिक काळ ताणतणावात असतात त्यांना अधिक उर्जा देणारे, अतिशय चविष्ट अन्न खाण्याची तीव्र इच्छा निर्माण होते कारण, अशा अन्नाचा वापर स्वतःला शांत करण्यासाठी केला जातो.

सजग खाण्यामध्ये आपल्याला भूक लागली आहे याची जाणीव, पोट भरल्याची भावना तृप्ती, अन्नपदार्थांची चव लक्षात येणे, एखादा अन्नपदार्थ खाण्याची आपल्याला तीव्र इच्छा होत आहे का? हे लक्षात येणं, आपण भावनेच्या भरात अधिक किंवा कमी खात आहोत का याची जाणीव होणं, आपण जसे आहोत तसा स्वतःचा स्वीकार करणं याकडे लक्ष देण्याचा सराव केला जातो. संशोधनानुसार सजग खाण्यामुळे अंतर्गत चरबी आणि ताणतणावाशी संबंधित कॉर्टिसोल हा हार्मोन कमी होण्यास मदत होऊ शकते. यामुळे नंतर होणारे अतिखाणे किंवा वारंवार स्नॅकिंगही कमी होऊ शकते. आपण अन्न खाताना अन्नाचा पोत, सुगंध आणि चव याकडे लक्ष दिल्यास खाण्याचा वेग कमी होतो आणि खाणे अधिक सजग होऊ शकते.

### अन्नपदार्थांच्या बाबतची द्विध्रुवी विचारसरणी

आहाराकडे फक्त चांगले किंवा वाईट अशा टोकाच्या दृष्टीने पाहणे म्हणजेच द्विध्रुवी विचारसरणी अशी मानसिकता असल्यामुळे अनेकदा आपले खाण्यावरचे नियंत्रण सुटण्यास कारणीभूत ठरते. यामध्ये व्यक्तीला असे वाटते की, तिने एखादा नियम मोडला आहे किंवा आहारातून भरकटली आहे. त्यामुळे ती व्यक्ती अधिक प्रमाणात खाणं सुरू करते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तिने दिवसभरात एक बिस्किट खाल्लं तर त्याला असं वाटू शकतं की आता आजचा आहार बिघडला आहे. आणि, मग उरलेल्या दिवसभरात तो त्याच्या मतानुसार वाईट असलेले अन्न खात राहतो. अन्न स्वतःहून चांगले किंवा वाईट नसते. आरोग्य आणि कल्याणावर सर्वात मोठा परिणाम एकूण आहार पद्धतीचा होतो. अन्नाशी संबंधित आपण बक्षीस-प्रेरित आणि व्यसनसदृश वर्तनांकडेही लक्ष ठेवणे महत्वाचे आहे. आपल्या शरीरात एक शक्तिशाली बक्षीस प्रणाली नैसर्गिकरित्या असते. मेंदूतील वेगवेगळे भाग अन्नाची इच्छा निर्माण करतात जसे डोपामिनमुळे अन्नाची ओढ वाढते तर ओपिऑइड्स आणि कॅनॅबिनॉइड्समुळे त्या क्षणी अन्नाचा आनंद मिळतो. अन्नाशी संबंधित व्यसनसदृश वर्तन दर्शवणारी लक्षणे ओळखणंही तितकंच महत्त्वाचं आहे. यामध्ये तीव्र प्रमाणात होणारे बिंज ईटिंग (अतिखाणे) आणि विशिष्ट अन्न खाण्याची तीव्र ओढ, अतिशय चविष्ट अन्नाला जास्त प्रतिसाद देणे अशी लक्षणे दिसतात का? याबाबत सजग असावे. आपण वर्तमानात सजग असतो तेव्हा आपण दैनंदिन आयुष्यातील लहानसहान गोष्टीत दयाळूपणाने वागतो. आनंदाचे छोटे क्षण जोपासून जीवनाच्या गूढतेबद्दल आपले कुतूहल आणि आश्चर्य भावना पुन्हा जागृत करू शकतो.

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५



# गुणकारी हिवर

मानवी जीवनासाठी व त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी, दीर्घायुष्य जगण्यासाठी अशा कितीतरी वनस्पती, फळंफुलांची, रानभाज्यांची, रानशेंगांची, कंदमुळांची या निसर्गाने पृथ्वीतलावर निर्मिती केली आहे. कोणी त्याचा उपयोग करतात तर काही जण त्यांच्याकडे ढुंकून बघतही नाहीत. जुनी माणसं अशाच वनस्पतींचा उपयोग करीत म्हणूनच ते निरोगी दीर्घायुष्य जगत. एक अतिशय बहुगुणी रानवनस्पती जिला झाडीबोलीत 'हिवरा' असं

लहान मुलांना होणारे 'किरीम' म्हणजे जंताचा त्रास संपविण्यासाठी हिवर वापरतात. हिवरच्या कोवळ्या झाडाच्या मुळ्या, पूर्ण वाढ झालेल्या झाडापेक्षा फायदेशीर आणि जास्त लाभदायक ठरतात. हिवराच्या झाडाची मुळं खणून आणतात. त्या मुळावरची साल काढून आतला भाग वेगळा करतात. त्याला झाडीबोलीत 'वाक' म्हणतात. या वाकाला कुटून, त्याचा रस लहान चमचाने अर्धा चमचा एक किंवा दोन वेळा पाजल्यास जंताचा त्रास जातो.

म्हणतात तर प्रमाण मराठीत 'हिवर' म्हणतात. हिच्या मुळांचा वास घरभर पसरतो. हिवर ही लहान मुलांच्या पोटाच्या विकारावर रामबाण उपाय आहे. खाण्यातून किंवा पाण्यातून झालेल्या जंतुसंसर्गामुळे होणारे त्रास नियंत्रित करते.

लहान मुलांना होणारे 'किरीम' म्हणजे जंताचा त्रास संपविण्यासाठी हिवर वापरतात. हिवरच्या कोवळ्या झाडाच्या मुळ्या, पूर्ण वाढ झालेल्या झाडापेक्षा फायदेशीर आणि जास्त लाभदायक ठरतात. हिवराच्या झाडाची मुळं खणून आणतात. त्या मुळावरची साल काढून आतला भाग वेगळा करतात. त्याला झाडीबोलीत 'वाक' म्हणतात. या वाकाला कुटून, त्याचा रस लहान चमचाने अर्धा चमचा एक किंवा दोन वेळा पाजल्यास जंताचा त्रास जातो.

मुळावरून काढलेली साल लहान मुलाच्या कंबरेला बांधतात. सोबतच वाक कुटून काढलेला रस बाळाच्या हातापायाच्या सांध्यांवर लावतात. अतिशय कडू असलेली ही वनस्पती एवढी गुणकारी आहे की तिच्या वासामुळेच पोटातील जंत संपत असावेत. हिवराचे झाड जंगलात आणि काही मोजक्याच ठिकाणी मिळते.

मात्र आजच्या पिढीला हिवरचे झाड कसे असते तेच ओळखता येत नाही. त्या झाडाची पानं आवळ्याच्या पानांसारखी बारीक असतात. निसर्गाच्या सान्निध्यात कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी न करता, खतपाण्याशिवाय वाढणाऱ्या या दुर्मिळ वनस्पतीचा आता विसर पडत आहे.

# वीरांगना ताराराणी श्रीवास्तव

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१



भारत छोडो आंदोलनाने भारतात जोर पकडला आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वात प्रत्येक गाव या आंदोलनात सहभागी झाले. मोर्चे, सभा, असहकार, मिरवणुकी काढून प्रत्येक प्रांत आपापल्या परिने आंदोलनाला बळ देत होता. स्वातंत्र्याचा सूर्य बघण्यासाठी सर्व आतुर होते. त्यासाठी प्रत्येक जण सिद्ध झाला होता, प्राणाची आहुती द्यायला तत्पर होता. ताराराणी ही अशी एक विरांगना की, जिने पतीला घायाळ अवस्थेत सोडून केवळ आपला तिरंगा पोलिस ठाण्यावर फडकवण्यासाठी स्वतःचे प्राणही धोक्यात टाकले. कोण होती ही वीरांगना?

इतिहासाच्या पानांवरून काही नाव पुसली गेली पण, त्यांनी त्या काळात दाखवलेलं शौर्य, धाडस असामान्यच होतं. वीरांगना ताराराणी श्रीवास्तव! बिहारच्या राजधानी पाटण्याजवळ असलेल्या सारण या गावी एका साधारण कुटुंबात तिचा जन्म झाला. लहानपणापासून स्वातंत्र्यलढ्याचे वारे तिने अनुभवले. बापूंचे भाषण, त्यांचा सत्याग्रह, दांडीयात्रा, आंदोलन या सर्वांनीच ती प्रेरित होती. आपल्यालाही या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेता यावा यासाठी तिचं मन कासावीस झालं होतं. पण, तो काळ असा होता की स्त्रियावर अनेक बंधन होती. मात्र, ती देशासाठी प्राणही अर्पण करायला तत्पर होती. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी तिचा विवाह फुलेंदू बाबू या अग्रणी स्वातंत्र्यसैनिकाशी झाला. फूलेंदू बाबू गांधीजींच्या विचारांनी भारावलेले होते. १९४२ च्या लढ्यात अग्रणी होते आणि समाजाविरुद्ध जाऊन त्यांनी आपल्या पत्नीला मानाचं स्थान दिलं. तिला स्वतःच्या बरोबरीने स्वातंत्र्यसंग्रामात उडी घ्यायला सहमती दिली. इतके दिवस मनात असणारी तिची ही इच्छा पूर्ण झाली. तिचे उद्दिष्ट एकच होते. ते म्हणजे आसपासच्या गावात जाऊन स्त्रियांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी प्रेरित करणे. तिच्या या प्रयत्नांना यश आलं. या विचारांनी प्रेरित होऊन, अनेक महिलांनी या आंदोलनात सहभाग घेतला आणि ती त्यांची प्रेरणास्थान बनली. सभा, मोर्चे, आंदोलनांनी प्रत्येक गाव पेटलं होतं. फुलेंदूबाबूंनी सेवना पोलीस चौकीवर तिरंगा फडकवण्यासाठी एकत्र येण्याचं आवाहन सगळ्यांना केलं. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून जवळपास ४,००० स्त्री पुरुष या मोर्चात सामील झाले होते. राष्ट्रप्रेमाने भारलेला हा मोर्चा पुढे निघाला होता. ती दोघं मोर्चाच्या समोर हातात तिरंगा घेऊन चालत होती. इंग्रजांविरुद्ध घोषणा देत होती. प्रचंड मोठा मोर्चा सेवना पोलीस स्टेशन जवळ आला. ब्रिटीशांनी मोर्चावर लाठीहल्ला केला. तरीही मोर्चा पुढे जात होता. आता त्यांनी गोळीबार सुरु केला.

या गोळीबारात फुलेंदू बाबू जखमी झाले. ती भयंकर घाबरली पण, त्या परिस्थितीतही फुलेंदू बाबूंनी तिला आपलं कर्तव्य पूर्ण करण्याचा आदेश दिला. दुःखी मनस्थितीत तिने त्यांच्या हाताला आपल्या पदराची पट्टी बांधली आणि वेगानेच ती पोलीस चौकीकडे निघाली. सर्व अडथळे पार करीत तिने सेवना पोलीस चौकीवर तिरंगा फडकवला आणि परत फिरली. तिने आपलं कर्तव्य बजावलं होतं पण अवघा दोन वर्षांचा संसार सोडून फुलेंदूबाबू शहीद झाले होते. दुःख करायलाही वेळ नव्हता. पण, फुलेंदू बाबूंचं एकच वाक्य मनात होतं, 'कोणताही कठीण प्रसंग आला तरी आसवं गाळत बसायचं नाही. या जीविताची शाश्वती नाही.' ब्रिटिश तिला शोधत होते आणि ती भूमिगत होती. स्वातंत्र्य लढ्यातील अनेक आंदोलनांमध्ये तिने सहभाग घेतला.

छापरा येथे फुलेंदू बाबू यांच्या श्रद्धांजली सभेत तिने एक संकल्प केला. 'हे क्रांतिकारकाचं जीवन आहे. कोणती गोळी कधी येईल आणि मृत्यू येईल हे सांगता येत नाही. या मायभूमीसाठी मी माझ्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आणि माझ्या अंतिम श्वासापर्यंत लढेन.' त्याप्रमाणे खरोखरच ती लढली आणि स्वातंत्र्याचा सुर्योदय बघून ती समाधानी झाली.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/८४२२०८९६६६

साधारणतः १९५०/५५ च्या आसपास, पुढे साठीपर्यंत जन्मलेल्या लोकांना 'जिंकू किंवा मरू' हे गीत चांगलं आठवत असेल. १९६२ मध्ये चीन सोबतच्या युद्धाच्या आसपास हे गीत अधिकच लोकप्रिय झालं होतं. माझा अगदी दुसरा-तिसरा वर्ग असेल, त्या काळात हे गीत वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. 'उपकार' या हिंदी चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे गाणं १९६६ च्या आसपास वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. त्यामुळे ही गाणी रोज वाचण्यात यायची आणि ती मुखपाठ झाली . मंडळी, हे मराठी गीत आपण बघू या.



# देशभक्ती गीत

नमस्कार मंडळी! या सदराच्या माध्यमातून आपण बऱ्याच काव्यप्रकारांची ओळख करून घेतली आणि मराठीच्या समृद्धीची, श्रीमंतीची पुरेपूर कल्पना येते. 'अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने' एवढी श्रीमंती आपल्या मराठीची आहे. मराठी काव्याचा आणखी एक विशेष प्रकार म्हणजे देशभक्त गीत! हे सर्वांना ठाऊक आहेच. शिवाय, शालेय जीवनात या देशभक्ती गीतांची ओळख सर्वांनाच झाली आहे.

जरा आठवा ते दिवस ! आपण लहान असताना कितीतरी देशभक्ती गीतं म्हणत असू. आजही स्वातंत्र्य दिन आणि गणतंत्र दिनाच्या दिवशी, शिवाय इतर राष्ट्रीय सणांच्या दिवशीही गीतं मोठ्या आवाजात लावली जातात. देशभक्ती गीत म्हणजे 'देशाप्रती प्रेम, निष्ठा, अभिमान आणि समर्पण व्यक्त करणारी, नागरिकांच्या मनात राष्ट्रीय एकतेची भावना जागृत करणारी काव्यरचना होय. हे गीत मातृभूमीचा गौरव, बलिदान, इतिहास आणि संस्कृतीचे वर्णन करते, त्यामुळे लोकांमध्ये प्रेरणा आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण होते.

या देशभक्तीपर काव्याची काही वैशिष्ट्ये आहेत. प्रेरणा आणि राष्ट्र प्रेम- ही गीतं स्वातंत्र्याचा लढा, सैनिक आणि देशाच्या महानतेवर आधारित असतात. ज्यातून नागरिकांमध्ये त्याग आणि समर्पणाची भावना रुजते. एकता व संस्कृती - यात विविध धर्म, जाती, नद्या, पर्वत आणि संस्कृतींचा उल्लेख करून देशाच्या एकात्मतेचे दर्शन घडवले जाते. ऐतिहासिक संदर्भ - ऐतिहासिक वीरांच्या कथा आणि स्वातंत्र्य चळवळीतील स्मृती या काव्यातून जागवल्या जातात. हा सगळा वारसा नव्या पिढीकडे हस्तांतरीत करण्यासाठी या गीतरचना महत्त्वाच्या ठरतात. आपल्याला ठाऊक असलेली देशभक्तीपर गाणी म्हणजे बलसागर भारत होवो, हे राष्ट्र देवतांचे, जय जय महाराष्ट्र माझा, जिंकू किंवा मरू, मंगल देशा पवित्र देशा, उठा राष्ट्रवीर हो, शूर आम्ही सरदार, सागरा प्राण तळमळला, जयोस्तुते श्री महन्मंगले, अनामवीरा, झेंडा आमुचा प्रिय, वेडात मराठे वीर दौडले सात, वंद्य वंदे मातरम ही गाणी आजही आपल्या स्मृतीकोषात जपून ठेवलेली आहेत .

वीररसपूर्ण देशभक्तीपर गाण्यांमध्ये देशाबद्दलचे प्रेम आणि आदर वाढवण्याचा मूळ गुण आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा संघर्ष प्रदीर्घ आणि कठोर होता. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे, आपण ज्या देशात राहतो, त्या देशाबद्दल कृतज्ञता बाळगण्यास प्रेरित करणाऱ्या देशभक्तीपर गाण्यांची यादी खूप मोठी आहे.

साधारणतः १९५०/५५ च्या आसपास, पुढे साठीपर्यंत जन्मलेल्या लोकांना 'जिंकू किंवा मरू' हे गीत चांगलं आठवत असेल. १९६२ मध्ये चीन सोबतच्या युद्धाच्या आसपास हे गीत अधिकच लोकप्रिय झालं होतं. माझा अगदी दुसरा-तिसरा वर्ग असेल, त्या काळात हे गीत वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. 'उपकार' या हिंदी चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे गाणं १९६६ च्या आसपास वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. त्यामुळे ही गाणी रोज वाचण्यात यायची आणि ती मुखपाठ झाली . मंडळी, हे मराठी गीत आपण बघू या.

**माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमचे सुरू**
**जिंकू किंवा मरू...**
**लढतील सैनिक लढू नागरिक**
**लढतील महिला लढतील बालक**
**शर्थ लढ्याची करू , जिंकू किंवा मरू**
**देश आमुचा शिवरायाचा**
**झाशीवाल्या रणराणीचा**
**शिर तळहाती धरू, जिंकू किंवा मरू**
**शस्त्राघाता शस्त्रच उत्तर**
**भूई न देऊ एक तसूभर**
**मरू पुन्हा अवतरू, जिंकू किंवा मरू**
**हानी होवो किती भयंकर**
**पिढ्यापिढ्या हे चालो संगर**
**अंती विजयी ठरू, जिंकू किंवा मरू**

**अगदी हावभाव करून हे गीत राष्ट्रीय सणांसाठी गायलं जायचं, हे अनेकांना आठवत असेल. दुसरं एक गीत बघू या !**

**वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्**
**माऊलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती**
**त्यात लाखो वीर देती जीविताच्या आहुती**
**आहुतींनी सिद्ध केला मंत्र वंदे मातरम्**
**याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले**
**शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले**
**शस्त्रहिना एक लाभो मंत्रवंदे मातरम्**
**निर्मिला हा मंत्र ज्यांनी आचरीला झुंजुनी**
**ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाऊनी**
**गा तयांच्या आरतीचे गीत वंदे मातरम्**

वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने या **गीताची आठवण न झाली तरच नवल!**

**उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढाऊ**
**अभिमान धरू बलिदान करू ध्वज उंच उंच चढवू**
**परक्यांचा येता हल्ला प्रत्येक घर बने किल्ला**
**हे कोटी कोटी होती भुजदंड**
**होतील इथे ध्वजदंड**
**छातीची करूनी ढाल, लाल त्या संगिनीस भिडवू**

किंवा

**झंडा आमुचा प्रिय देशाचा फडकत वरी महान**
**करितो आम्ही प्रणाम याला करितो आम्ही प्रणाम**

जितकी गाणी/कविता आपण आठवू तेवढं कमीच आहे. आनंदाची बाब म्हणजे 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाव्दारे' दरवर्षी या समरगीत/देशभक्तीपर गाण्यांच्या स्पर्धा होतात. २००६ मध्ये गीत लेखनाचीही स्पर्धा झाली होती. त्यात,

**सह्याद्रीचे गडे गर्जले हाक हिमालय घाली**
**चला उठा रणशिंग वाजले एक गर्जना झाली**

या काव्यलेखनासाठी मला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला होता. जरा विषयांतर झालं. राष्ट्रीय सणांना ध्वजवंदन न करता तो दिवस सुट्टीचा मानणाऱ्या लोकांना, राष्ट्रगीत ऐकल्यावर अंगावर उठणारे रोमांच कळणारच नाहीत. शिवाय, जिथे कुठे कार्यक्रम होतात, तिथे हिंदी राष्ट्र भक्ती गीतं गायली-वाजवली जातात. हिंदीला विरोध नाही पण, किमान महाराष्ट्रात ही मराठी-हिंदी संमिश्र गाणी गायली गेली तर पुढल्या पिढीला मराठी गीतांची किमान ओळख राहील. सध्या तरी एवढेच!

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३

# मेरा वो सामान लौटा दो...



गाणं म्हटलं कविता म्हटली की सगळ्यात आधी आपल्या मनात येते त्याची चाल, वापरले गेलेले शब्द, यमक, ताल, त्यात वापरला गेलेला राग आणि इतर सगळी साधनं...तसं पाहिलं तर प्रत्येकच कवितेला चाल लागल्यानंतर तीचं गाणं होतं...पण, हिंदी आणि मराठी गाण्यांमध्ये काही गाणी अशी आहेत की यमक जुळणारे शब्द नसून सुद्धा किंवा मुक्तछंदात्मक रचना असून सुद्धा त्याची गाणी झाली आणि ती अतिशय लोकप्रिय झाली.

१९८७ मध्ये प्रदर्शित झालेला चित्रपट इजाजत..या दशकाचा काळ हा चित्रपटांमध्ये प्रेम कथांचा काळ म्हणून प्रसिद्ध होता. मिलन, विरह, वेदना ,काही काही अचानक घडणाऱ्या घटना. अशा भरपूर रंजकतेने हे चित्रपट लोकप्रिय होत होते. इजाजत हा चित्रपट देखील याच धाटणीतला. यातली सगळीच गाणी तशी लोकप्रिय झालेत पण गीतकार गुलजार यांचं आणि राहुल देव बर्मन यांनी संगीतबद्ध केलेलं,'मेरा वो सामान लौटा दो आशा भोसले यांच्या मखमली आवाजात असलेले हे गाणं खरंच मनाचा वेध घेतं.

**मेरा कुछ सामान ,तुम्हारे पास पडा है**
**सावन के कुछ भीगे भीगे दिन रखे है, और मेरे खत मे लिपटी रात पडी है, वो रात बुझा दो,**
**मेरा वो सामान लौटा दो...**

या गीतामधली शेवटची ओळ वारंवार प्रत्येक कडव्यानंतर येत राहते. प्रत्येक वेळा ती वेगवेगळे संदर्भ घेऊन येते. चित्रपटातील माया या पात्राला मिळालेले हे गाणं आणि भूमिका साकारली आहे अनुराधा पटेल या गुणी अभिनेत्रीने. खरं म्हणजे, नसरुद्दीन शाह आणि रेखा यांच्यासोबत अभिनयाची टक्कर देताना, तिच्यावर चित्रित झालेले हे गाणं इतकं लोकप्रिय व्हावं, हा योगायोग म्हणण्यापेक्षा या गाण्याचे केलेले चित्रीकरण आणि याला दिले गेलेले संगीत आणि त्यावरचा तिचा अभिनय हे असावं. चित्रपटातल्या माया या पात्राला तिच्या स्वभावाला, तिच्या वृत्तीला अगदी साजेसे हे गीत.

माया आणि महिंद्र यांच्या मधील एक अनाकलनीय नातं, या गाण्यातून प्रेक्षकांच्या समोर येतं. प्रेमाच्या खुणा सांगणाऱ्या काही वस्तू, काही गोष्टी जेव्हा प्रेमीकेला परत मिळतात ,तेव्हा वस्तूंच्या पलीकडे देखील, काही प्रेमाने ओथंबलेले क्षण असतात,ते कसे परतवले जातील? हा प्रश्न हे गाणे आपल्यासमोर निर्माण करतो.

**पतझड है कुछ, है ना?**
**पतझड मे कुछ पत्तो के गिरने की आहट..**
**कानो मे एक बार पहन के लौट आई थी...**
**पतझड की वो शाखा अभी तक काँप रही है...**
**वो शाख गिरादो..**
**मेरा वो सामान लौटा दो...**

या कडव्यामध्ये संतूर चा अतिशय चपखलपणे वापर केलेला जाणवतो. आणि पडद्यावर दिसत राहते झाडाची निष्पर्ण फांदी, झाडापासून पान वेगळं झाल्यावर जसं सैरभैर होतं तशी कदाचित तिच्या मनाची अवस्थ यातून जाणवत असावी. दोघांनी एकत्र घालवलेले, श्रावणातल्या बरसातले काही क्षण देखील तिच्या मनावर कोरले गेले आहेत. ते कसे ते मनातून वेगळे करू शकणार?

**'एक अकेली छत्री मे जब आधे आधे भिग रहे थे..**
**आधे सुखे, आधे गीले...**
**सुखा तो मैं ले आई थी...**
**गीला मन शायद बिस्तर के पास पडा हो...**
**वो भिजवा दो...**
**मेरा वो सामान लौटा दो...'**

कितीतरी हळुवार क्षण त्यांनी असे एकत्र घालवलेले असतील. कदाचित प्रेमाच्या व्याख्येच्या पलीकडले. कारण महेंद्र आणि माया या दोघांचाही पडद्यावरचा वावर हा प्रेक्षकांच्या मनात कितीतरी हळवे प्रश्न निर्माण करतो. दोघांपैकी कोणाचीच चूक नाही. चूक आहे ती फक्त परिस्थितीची. हे जाणे प्रेक्षकांच्या मनात घर करते..

**'एक सौ सोलह, चांद की राते...**
**एक तुम्हारे कांधे का तिल...**
**गीली मेहंदी की खुशबू..**
**झुठमुठ के शिकवे कुछ,**
**झुठ्मुठ के वादे भी,**
**सब याद करा दो...**
**सब भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो..'**

एकत्रित घालवलेले आहे या साऱ्या क्षणांची आठवण तिच्या मनाला अधिक व्याकुळ करते. खरंच, या क्षणांचा परतावा शक्य नाही, हे जाणीवदेखील दोघांच्या मनामध्ये असते. प्रेमाने आपली एक वेगळीच दुनिया निर्माण केलेली असते. शरीराच्या पलीकडे, आत्म्याशी जुळलेलं हे प्रेम प्रेक्षकांना अस्वस्थ करून सोडते.

**एक इजाजत दे दो बस..**
**जब इसी को दफनाऊंगी..**
**मै भी वही सो जाऊंगी...**
**मै भी वही सो जाऊंगी...**

आणि इथे हे गाणं संपतं. ते रसिकांच्या मनात कायम आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# सह्याद्री हॉस्पीटलमध्ये मुख्यमंत्री सहायता निधीतून यशस्वी शस्त्रक्रिया

## खूबा व गुडघा प्रत्यारोपन शस्त्रक्रिया, डॉक्टरांचे सर्वत्र कौतुक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
शहरातील सह्याद्री हॉस्पिटल, हिंगोली येथे वैद्यकीय क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. हॉस्पिटलमध्ये प्रथमच 'मुख्यमंत्री सहायता निधी' अंतर्गत खूबा प्रत्यारोपण आणि गुडघा प्रत्यारोपन या दोन अत्यंत क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत. उपचारांनंतर दोन्ही रुग्णांची प्रकृती उत्तम असून त्यांना आनंदाने डिस्चार्ज देण्यात आला आहे.

आता कृत्रिम सांधा प्रत्यारोपणासारख्या प्रगत शस्त्रक्रियांसाठी हिंगोली जिल्ह्यातील रुग्णांना मुंबई, पुणे किंवा नागपूरसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाण्याची अजिबात गरज उरलेली नाही. मुख्यमंत्री सहायता निधीमुळे रुग्णांना मोठा आर्थिक आधार मिळत असून, उपचारांचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणावर कमी होत आहे.

रियाज शेख (वय ३५ वर्ष) यांना मोठा आधार मिळाला आहे. रियाज हे गेल्या काही काळापासून हिप या गंभीर आजाराने त्रस्त होते. त्यांच्यावर यशस्वी हिप रिप्लेसमेंट (खूबा प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच गोदावरी सावळे (वय ४५ वर्ष) यादेखील गेल्या १० वर्षांपासून तीव्र गुडघेदुखीने त्रासलेल्या होत्या. त्यांच्यावर यशस्वी गुडघा प्रत्यारोपण (घपशश ठशश्रिरलशाशपीं) शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर दोन्ही रुग्ण पूर्णपणे वेदनामुक्त झाले असून त्यांनी हॉस्पिटलच्या संपूर्ण वैद्यकीय टीमचे आभार मानले व समाधान व्यक्त केले.

मुंबई येथे सांधा प्रत्यारोपण आणि अत्याधुनिक शस्त्रक्रियांचा प्रदीर्घ अनुभव असलेले डॉ. अरुण काळे (अस्थिरोग व सांधा प्रत्यारोपण तज्ज्ञ) आता सह्याद्री हॉस्पिटल, हिंगोली येथे पूर्णवेळ सेवा देत आहेत. त्यांच्याच कुशल मार्गदर्शनाखाली या दोन्ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्या.

या दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय टीमचे मोठे योगदान लाभले. यामध्ये तज्ज्ञ डॉ. अरुण काळे, डॉ. यशवंत पवार, डॉ. स्वाती पवार, भूलतज्ज्ञ, डॉ. अमोल धुळधुळे, डॉ. शीतल काळे, सहकारी व परिचारिका ज्ञानेश्वर जगताप, गंगाप्रसाद पाईकराव, वैभव गडगीळ, आणि सोनाली यांनी सहकार्य केले.

# महिला व बालकल्याण विभागाच्या संयुक्त मोहीमेची अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये शून्य ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी महिला व बालविकास विभागाच्या संयुक्त तपासणी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या. तसेच प्रत्येक बालकाची वजन व उंची मोजणी, पोषणस्थितीचे मूल्यमापन आणि नियमित लसीकरणाची प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

महिला व बालविकास विभागाच्या संयुक्त तपासणीबाबतची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) विजय बोराटे यांनी प्रास्ताविक करून संयुक्त तपासणी मोहिमेची उद्दिष्टे, नियोजन व अंमलबजावणीबाबत माहिती दिली.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आरोग्य विभाग, बाल विकास प्रकल्प अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पर्यवेक्षिका, समुदाय आरोग्य अधिकारी, आरबीएसके पथके तसेच अंगणवाडी सेविका यांची भूमिका स्पष्ट केली. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून अंगणवाडी केंद्रातील प्रत्येक बालकाचे वजन व उंची मोजणे, आरोग्य तपासणी करणे, पोषणस्थितीचे मूल्यमापन करणे आणि लसीकरणाची शंभर टक्के अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाचे प्रतिनिधी, बाल विकास प्रकल्प अधिकारी विवेक वाकडे, विस्तार अधिकारी अविनाश बोथीकर तसेच सर्व पर्यवेक्षिका प्रत्यक्ष उपस्थित होत्या. तर सर्व तालुका आरोग्य अधिकारी आणि समुदाय आरोग्य अधिकारी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभाग नोंदविला.

# बेटी बचाव, बेटी पढाव टास्कफोर्स बैठकीत विविध योजनांचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी. तसेच महिला व बालकांना आवश्यक सेवा अधिक सक्षमपणे उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

महिला व बालविकास विभागाच्या सनियंत्रण समितीची तसेच जिल्हास्तरीय 'बेटी बचाव, बेटी पढाव' योजनेंतर्गत टास्कफोर्सची बैठक आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.

यावेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संतोष दरपलवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, विधी सल्लागार, सहाय्यक पोलिस निरीक्षक, केंद्र प्रशासक, समुपदेशक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये 'बेटी बचाव, बेटी पढाव' योजना, वन स्टॉप सेंटर तसेच महिला समुपदेशन केंद्राच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. केंद्र पुरस्कृत विविध योजनांची जनजागृती व प्रचार-प्रसिद्धी अधिक प्रभावीपणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच हिंगोली येथे वन स्टॉप सेंटरच्या स्वतंत्र इमारतीच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.



हिंगोली- जंतरमंतरवर विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्यानंतर येथील गांधी चौकात काँग्रेसच्या युवा कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### सांदीपनीमध्ये कारगील विजय दिवस साजरा



हिंगोली-सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर, तरोडा (बु.), नांदेड येथील शाळेत कारगिल विजय दिवस व आषाढी एकादशी निमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे संचालक सुनील राठोड यांच्या हस्ते शहीद झालेल्या शूरवीरांना आदरांजली वाहिली त्यानंतर विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्ती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली सुरुवातीला कारगिल विजय दिवस या विषयावर विद्यार्थ्यांनी भाषण केले. त्यानंतर आषाढी एकादशी निमित्त शाळेच्या मैदानात टाळ मृदुंग लेझीम यांनी सर्व वारकरी मंडळींनी प्रेक्षकांची मने जिंकली सौ.सीमा सावंत, सौ मनोरमा राठोड, सौ.अयोध्या यांनी अभंगाच्या माध्यमातून सर्वांची मने जिंकली. यावेळी संचालक सुनिल राठोड, सहसंचालक मुकूल राठोड, सौ. माहेश्वरी मुकूल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, प्रशासक मारूती मेखाले यांची प्रमुख उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले

# आषाढी एकादशीनिमित्त नर्सीत भाविकांना फराळाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
देवशयनी आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या पवित्र जन्मभूमीत नर्सी नामदेव येथे विठ्ठल रुक्मिणी आणि संत नामदेव महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांचा जनसागर उसळला होता. या सर्व वारकरी व भाविकांच्या सेवेसाठी नर्सी येथील सामाजिक कार्यकर्ते श्री माणिक लोढे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात अल्पोपहार (फराळ) वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

एकादशीच्या दिवशी दर्शनासाठी दूरवरून आलेल्या हजारो भाविकांना उपवासाच्या फराळाचे वाटप करण्यात आले. माणिक लोढे हे सामाजिक आणि धार्मिक भान जपत दरवर्षी आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर हा उपक्रम अविरतपणे राबवत असतात.

यावेळी बोलताना माणिक लोढे म्हणाले, वारकऱ्यांची आणि विठ्ठलभक्तांची सेवा करणे हेच आमचे परमभाग्य आहे. विठूराया आणि संत नामदेव महाराजांच्या कृपेने ही सेवा दरवर्षी अशीच अखंड सुरू राहील.

या फराळ वाटपाच्या उपक्रमामुळे दर्शनासाठी रांगेत उभा असलेल्या आणि लांबून आलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला. उपस्थित सर्व वारकरी व भाविकांनी या अन्नदानाबद्दल आणि लोढे यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले व त्यांना उदंड आयुष्याचे आशीर्वाद दिले. या कार्यक्रमाप्रसंगी परिसरातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ आणि तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून शिस्तबद्ध रीतीने भाविकांना फराळाचे वाटप करून हा धार्मिक सोहळा यशस्वीरीत्या पार पाडला.

# गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा यासाठी आज गो सन्मान महारॅली




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा आणि देशातून गोवधाचे कलंक मिटावे यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंगोलीत येत्या २७ जुलै रोजी सोमवारी भव्य 'गो सन्मान महा रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. 'गौ सन्मान आवाहन अभियान' अंतर्गत होणारी ही रॅली सकाळी १० वाजता बद्रीनारायण मंदिर गांधी चौक येथून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचणार आहे.

आयोजकांच्या म्हणण्यानुसार ज्या गोमातेने आपल्याला आयुष्यभर काही ना काही दिले आहे, आज तिच्यासाठी उभे राहण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या दिव्य कार्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन गोमातेप्रती असलेले प्रेम व्यक्त करावे असे आवाहन करण्यात आले आहे. या रॅलीच्या माध्यमातून गोमातेला राष्ट्रमाता म्हणून घोषित करावे, गोसेवेला प्रोत्साहन द्यावे आणि गोवध थांबवावा या मागण्या प्रशासनाकडे मांडल्या जाणार आहेत.

'यही समय है दर्शक नहीं सहभागी बने' असा नारा देत गोमातेच्या प्राणांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने वेळ काढावा असे आवाहनही करण्यात आले आहे. रॅलीमध्ये 'गोमाता की जय', 'गोमाता राष्ट्रमाता' आणि 'गो सेवा देश सेवा' अशा घोषणा देत मोठ्या संख्येने नागरिक, महिला आणि युवा वर्ग भगवे झेंडे घेऊन सहभागी होणार आहेत.

ही रॅली बद्रीनारायण मंदिर गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली या मार्गावरून काढली जाणार असून या रॅलीचे आयोजन सकल हिंदू समाज, हिंगोली यांच्यावतीने करण्यात आले आहे. रॅलीच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त विविध शाळांमध्ये दिंडीसह कार्यक्रमांचे आयोजन, विठ्ठल नामाचा गजर







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर आज हिंगोली शहरातील विविध शाळांच्या वतीने अत्यंत उत्साहात भव्य रॅली (दिंडी) काढण्यात आली. या दिंडीमध्ये लहान-लहान विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर माऊली व विविध संतांच्या मनमोहक वेशभूषा साकारल्या होत्या.

बालवारकऱ्यांचे हे नयनरम्य देखावे आणि 'विठ्ठल-विठ्ठल विठ्ठला, हरि ओम विठ्ठला'च्या जयघोषाने संपूर्ण हिंगोली शहर विठ्ठलमय झाले होते.

ही रॅली शहरातील मंगळवारा भागासह विविध भागांतून थाटामाटात काढण्यात आली. त्यानंतर इंदिरा गांधी चौक, जवाहर रोड अशा मुख्य मार्गांवरून फिरत गांधी चौकामध्ये रॅलीचा भक्तिमय वातावरणात समारोप करण्यात आला. डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि हातात टाळ-मृदंग घेऊन तल्लीन झालेले बालवारकरी शहराचे मुख्य आकर्षण ठरले होते. सर्वत्र ऐकू येणाऱ्या विठ्ठलाच्या जयजयकाराने नागरिकही या भक्तिरसात न्हाऊन निघाले.



शहरातील ए.बी.एम. इंग्लिश स्कुलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी संस्थाध्यक्ष दिलीप बांगर, अंजिक्य बांगर, प्राचार्य रॉबीन वरगीस, उपप्राचार्य सचिन डोईफोडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम मान्यवराच्या हस्ते विठ्ठल रुख्मीनी च्या मुर्तीचे व पालखीचे पुजन करण्यात आले. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी विठ्ठल- रुख्मीनी, संत व वारकरी यांची वेशभुषा परिधान केली होती. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल-विठ्ठल नामाच्या जयघोषात दिंडीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी विविध नृत्य व फुगडी आदी खेळाचे प्रदर्शन केले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी गांधी चौक येथे विविध सांस्कृतीक नृत्य सादर केले. तसेच संत गोरा कुंभार हि नाटीका सादर करुन उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद म्हणून शाबुदाना उसळ वाटप करुन कार्यक्रमाची सांगता आली. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

शहरातील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयातही आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, संजय गुठ्ठे यांच्यासह शिक्षकांनी सहभाग नोंदविला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

# भोंदूबाबाचा अंनिस कार्यकर्त्यावर जीवघेण्या हल्ल्याचा प्रयत्न

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २६ जुलै -**

अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि बनावट चमत्कारांविरोधात सातत्याने आवाज उठविणाऱ्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सहकार्यवाह तथा पत्रकार कमलाकर चंद्रकांत जमदाडे यांनी स्वतः वर पूर्वनियोजित जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप केला असून, याप्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दाखल केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

फिर्यादीनुसार, काही महिन्यांपूर्वी बडूर येथील भोंदूबाबा प्रकरणात पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात कमलाकर जमदाडे हे तक्रारदार व साक्षीदार आहेत. त्या प्रकरणाचा राग मनात धरून आरोपीने सूडबुद्धीने हा हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**रस्ता अडवून चाकूसदृश वस्तूने वाराचा प्रयत्न**

२५ जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास बिलोलीहून रुद्रापूरकडे जात असताना आरोपीने मोटारसायकलवरून पाठलाग केला. कासराळी-रुद्रापूर मार्गावरील शेताजवळ अचानक मोटारसायकल आडवी घालून रस्ता अडविल्यानंतर चाकूसदृश वस्तूने वार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा फिर्यादीचा आरोप आहे. प्रसंगावधान राखत मोटारसायकल पुढे दामटल्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपीने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

**व्हॉट्सअॅप स्टेटसवरून पूर्वनियोजित कटाचा संशय**

घटनेपूर्वी आरोपीने व्हॉट्सअॅप स्टेटसवर तेरा आज आखरी दिन होगा असा मजकूर ठेवला होता, तसेच घटनेच्या दिवशी भोंदूबाबा ने रुद्रापूर येथे जाऊन फिर्यादीच्या येण्या-जाण्याची माहिती घेतल्याचे काही स्थानिकांनी सांगितल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यामुळे हा पूर्वनियोजित कट असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**पोलीस संरक्षणाची मागणी**

फिर्यादीने आरोपीविरुद्ध खुनाचा प्रयत्न, जीवे मारण्याची धमकी व इतर गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. तसेच घटनास्थळाचा पंचनामा, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, सीसीटीव्ही, मोबाईल कॉल डिटेल्स व व्हॉट्सअॅप स्टेटसची तपासणी करून पुरावे जप्त करावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. सामाजिक कार्यामुळे स्वतः च्या व कुटुंबाच्या जीविताला धोका निर्माण झाल्याने पोलीस संरक्षण देण्याची विनंतीही अर्जात करण्यात आली आहे.

**तपासानंतरच सत्य स्पष्ट होणार**

सदर प्रकरणात फिर्यादीने गंभीर आरोप केले असून, या आरोपांची सत्यता पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. वृत्त लिहिपर्यंत गुन्हेनोंद प्रक्रिया सुरु झाली असून पोलीस प्रशासन याप्रकरणी कोणती भूमिका घेते आणि पुढील कायदेशीर कारवाई काय होते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जिल्हा व शहर काँग्रेसच्या निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर अन्याय

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ जुलै -**

नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीमध्ये निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना डावलून खा.रवींद्र चव्हाण यांनी मोठा अन्याय केला असून आयाराम गयारामांची महत्वाच्या पदांवर वर्णी करून पक्षाला भाजपच्या दावणीला बांधले आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करून निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी बालाजी चव्हाण यांनी पक्षाच्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र सह प्रभारी रिहाना चिश्ती यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड दौर्यावर आलेल्या रिहाना चिश्ती यांची प्रत्यक्ष भेट घेवून बालाजी चव्हाण यांनी निवेदन सादर केले. निवेदनात नमुद करण्यात आले की, मागील दोन वर्षामध्ये काँग्रेस पक्षामध्ये भाजप पक्षाचे स्पीपर सेल म्हणून (बी टीम) काम करणार्या बंडखोर कार्यकर्त्यांना काँग्रेस पक्षाच्या खा. रविंद्र चव्हाण यांनी निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून बंडखोरांना पदे दिली आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते पदाधिकार्यांचे मन दुखावली असून त्यांच्यावर अन्याय केला आहे.

मागील १३ नगरपालीका निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी देण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी उमेदवारच मिळाले नाहीत. आणि ज्या लोकांना उमेदवारी देण्यात आली ते उमेदवार मोठ्या मतांच्या फरकाने पराभूत झाले आहेत.खासदार रविंद्र चव्हाण यांच्या लोकसभा मतदार संघामध्ये एकही नगरपालीका, नगरपंचायत मध्ये नगराध्यक्ष निवडुन आलेला नाही. तसेच १८५ जागांवर उमेदवारी दिली होती. केवळ ४७ नगरसेवक निवडुन आले. बाकी सर्व उमेदवारांचा पराभूत झाले. त्याठिकाणी पक्षाच्या एकही स्टार प्रचारक प्रचारासाठी बोलावण्यात आले नाही.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकामध्ये सुद्धा अशाच प्रकारचे गलीच्छ राजकारण करून काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ व निष्ठावंत कार्यकर्त्याला डावलण्यात आले. आवश्यकता नसताना वंचित बहुजन महासंघासोबत युती करून काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांवर विशेषतः दलित समाजातील कार्यकर्त्यांवर मोठा अन्याय करण्यात आला. त्यामुळे पक्षातील अनेक दलित पदाधिकारी पक्ष सोडून इतर पक्षामध्ये गेले, काही जण घरी बसले. व पक्षातील कार्यकर्त्यांना ए. बी. फॉर्म देताना अनेक चुका केल्या.

समाजाच्या कार्यकर्त्यांवर व हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांवर अन्याय केल्यामुळे दोन्ही समाज त्यांच्यावर प्रचंड नाराज होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये मुस्लिम समाज हा काँग्रेसपासून दूर गेला. आणि महानगरपालीका निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाकडून तीन ते चार वेळेस निवडुन आलेले नगरसेवक काँग्रेस पक्ष सोडून एमआयएम मध्ये गेले. त्याठिकाणी एमआयएम १४ नगरसेवक निवडुन आले. त्यातील बहुतांश नगरसेवक हे काँग्रेसचेच होते.

माजी शहराध्यक्ष अब्दुल सत्तार यांना काँग्रेस पक्षाने महापौर, विरोधी पक्ष नेता, विधानसभेचे उमेदवारी दिली व त्यांचा मुलगा अब्दुल गफ्फार हे उपमहापौर होते. एवढे सर्व एकाच परिवारात दिल्यामुळे मुस्लिम समाजातील इतर पदाधिकारी नाराज होवून काँग्रेस पक्ष सोडून गेले. शहराध्यक्ष अब्दुल सत्तार यांना विधानसभेची उमेदवारी दिल्यानंतर सुद्धा त्यांनी कोणत्याच काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता निवडणुक लढवली.

या सर्व बाबीचा विचार करून आपण काँग्रेस पक्षाच्या बंडखोरांवर भाजपातून आलेले (बी. टीम.) यांची हकालपट्टी करावी व काँग्रेस पक्षातील निष्ठावंत आणि ज्येष्ठ पदाधिकार्यांची वर्णी लावावी आणि काँग्रेस पक्ष वाचवावा,अशी मागणी बालाजी चव्हाण यांनी केली आहे.

## साहित्यिक रुचिरा बेटकर यांना 'डॉ. अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६' जाहीर



**नांदेड**-साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक, साहित्यिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी नांदेड येथील साहित्यिक रुचिरा शेषराव बेटकर यांची 'डॉ. अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार-२०२६' साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन शनिवार, दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ०३:३५ वाजता साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे चौक, नांदेड येथे करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन लहुजी साळवे युवक संघ, नांदेड आणि साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव समिती, नांदेड यांच्या वतीने संयुक्तपणे करण्यात आले आहे. रुचिरा बेटकर यांच्या या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन केले जात असून, या सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आदमपूरात टाळ-मृदगांच्या गजरात आषाढी दिंडी

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २६ जुलै -**



तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे आषाढी एकादशी निमित्त दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी शनिवार दि.२५ जुलै रोजी सायंकाळी आदमपूर परिसरातील वारकरी भक्तांनी टाळ मृदंगाच्या गजरात दिंडी काढलेली होती.भजन,कीर्तन,हरिनामाचा जप करीत ही दिंडी विठ्ठल रूक्मिणी मंदिरापासून गावा भोवताली प्रदक्षिणा घालीत मार्गस्थ झाली होती.गावात वैष्णव भक्त वारकरी संप्रदायाचीपरंपरा अनेक वर्षांपासून अखंडपणे जपली जात असून यंदाही आषाढी एकादशी पर्वानिमित्त दिंडी सोहळ्याचे आयोजन अत्यंत भक्तिमय वातावरणात करण्यात आले.ही परंपरा केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्य,संस्कार आणि भक्तिचा वारसा जपणारी आहे. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या गजरात परिसरात भक्तिरसाचे चैतन्य निर्माण झाले होते.प्रतिवर्षी गावातील काही विठ्ठल भक्त पायी वारीसाठीही जात असतात.

सदरील दिंडीत लहान मुले, वारकरी अबाल,वृध्द, महिला व पुरुषांचा सहभाग उल्लेखनीय होता. एकादशी निमित्त वैष्णव भक्तांनी दिवसभर उपवास ठेवला आणि सायंकाळी चेअरमन चंद्रकांत पाटील आणि योगेश पाटील यांच्या माडीवजा ओसरीत रात्रभर भजन,कीर्तन वारकऱ्यांनी संपन्न केल्यानंतर, दुसर्या दिवशी रविवार दि.२६ जुलै रोजी उपवास ठेवलेल्या व इतर भाविक भक्तांसाठी प्रतिवर्षी प्रमाणे जेवणाचे माडीवर आयोजन पाटील परिवाराकडून करण्यात आले होते.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात आज कारगिल विजय दिवसाचे आयोजन

**नांदेड**-जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात २७ वा कारगिल विजय दिवस दिनांक २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. तरी सर्व माजी सैनिक, शहीद जवानांचे नातेवाईक व समाजातील देशभक्त यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी केले आहे.शहीद सैनिकाच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे २७ वा कारगिल विजय दिवस साजरा करण्याचे ठरले आहे. समाजातील नागरिकांमध्ये तसेच १८ ते २५ वर्षे वयोगटातील युवकांमध्ये कर्तव्य भावना व सैनिकांबद्दल अभिमान दीर्घकाळ जिवंत राहावा व आपल्या कर्तव्याची जाणीव समाजातील जनतेत सतत निर्माण व्हावी व देशभक्तीची ज्वलंत उर्जा कायम राहावी म्हणून संपूर्ण देशात दरवर्षी २६ जुलैला कारगिल विजय दिवस कारगिल युद्धामध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करून साजरा करण्यात येतो.

## बाबू शिंदे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप जाहीर



**नांदेड** -नांदेड येथील, आंबेडकर, चलवळीतील सामाजिक कार्यकर्ते, अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स, नांदेडचे जिल्हाध्यक्ष व नांदेड़ शहर काँग्रेस कमेटी सामाजिक न्याय विभागाचे उपाध्यक्ष बाबू शिंदे यांना दिल्ली येथील भारतीय दलित अकादमी तर्फे देण्यात येणारा सन २०२६ या वर्षाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार दिल्ली येथे दि. १२ ते १३ डिसेंबर २०२६ रोजी देशातील व विदेशातील मान्यवर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे, असे राष्ट्रीय अध्यक्षांनी पत्राद्वारे कळविले आहे. बाबू शिंदे हे अन्याया विरूद आवाज, उठवणारे व अन्यायाला वाचा फोडणारे, बाबू शिंदे हे गेल्या दोन दशकापासून समाजामध्ये कार्य करत आहेत. लॉकडाऊनमध्ये बाबू शिंदे यांनी खूप छान काम केले. कुणाला अन्नदान केले, तर कुणाला सॅनिटाइजर मोफत वाटले. तसेच महापुरुषांच्या जयंती साजरी करतात. फेलोशिप पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल बाबू शिंदे यांचे मित्र, परिवार अनिल कांबले, सुनील खिलारे, जालिंदर नरवाडे, शंकरशिंग ठाकूर, मारोती शिकारे, डॉ. संजय वाघ, प्रा. मनोहर पवार, प्रा. शशिकांत हाटकर, प्रा. झुजारे शरद, सुरेशजी हाटकर, जगदीश चावडा, प्रल्हाद एडके किनवटकर आर्दीनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## विठुरायाच्या जयघोषाने सहयोग कॅम्पस दुमदुमला

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २६ जुलै -**



विष्णुपुरी सहयोग कॅम्पसमध्ये इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या चिमुकल्यांनी आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'मिनी पंढरी' दिंडी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय होऊन ज्ञानोबा-तुकाराम, माऊली... माऊली..., विठ्ठल... विठ्ठल... अशा अखंड जयघोषाने कॅम्पस दुमदुमून गेला. पारंपरिक वारकरी वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पंढरपूरचे दर्शन घडविले.

आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'मिनी पंढरी' दिंडी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात चिमुकल्या वारकऱ्यानी टाळ, भगवे झेंडे, तुळशीवृंदावन आणि डोक्यावर तुळशीची कुंडी घेऊन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीत सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या हस्ते पालखी पूजन करून झाली. त्यानंतर त्यांनी स्वतः पालखी खांद्यावर घेत दिंडीची सुरुवात केली.यावेळी पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि विठ्ठल नामाचा गजर करत संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.या प्रसंगी इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचे प्राचार्य विक्रम ढोणे, उपप्राचार्या रुपाली गुंडाळे तसेच अशोक मेटकर, विष्णुकांता पवार, सुनंदा शेळके, हेमा येलके, विजयश्री तेलंगे, नरेंद्रकुमार वनंजे बुधदेव सोनपारखे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या रस्त्याच्या मागणीसाठी मुख्यमंत्री यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २६ जुलै -**

लेंडी प्रकल्पग्रस्त भेंडेगाव बु. , भिंगोली, हसनाळ व कोळनूर या चार गावांतील नागरिकांनी जुन्या डांबरीकरण रस्त्याच्या कामास तातडीने मंजुरी देऊन काम सुरू करावे या मागणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री, लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नांदेड जिल्हा परिषद दक्षिण (बांधकाम) विभागाकडून सन १९८३-८४ दरम्यान नांदेड- बिदर राष्ट्रीय महामार्गावरून विठ्ठल मंदीर - रूपचंद तांडा- भेंडेगाव बु. भिंगोली - हसनाळ व कोळनुर गावांना जोडणारा रस्ता तयार करण्यात आला होता. मात्र हा रस्ता पूर्णतः उखडला आहे. सध्या लेंडी प्रकल्प बाधित वरील पाचही गावांचे पुनर्वसन या रोडलगत करण्यात आले आहे. लेंडी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावांतील नागरिकांना अनेक वर्षांपासून दर्जेदार रस्त्याअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था झाल्याने शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे शासनाने याच रस्त्याचे खास बाब म्हणून मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा ३ च्या बजेट मधून या रोडचे डांबरीकरण करून धरणग्रस्तांची होणारी गैरसोय दूर करण्यात यावे. सन १९८६ पासून चालू असलेल्या धरणामुळे बारा गावातील नागरी सुविधा अभावी एक पिढी विकासापासून वंचित राहिली आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर नामदेव भेंडेगावकर, सरपंच सुशिल देशमुख , हणमंतराव डेंग, शेषराव पाटील, दामोदर पाटील, व्यंकटराव टिपराळे,

संभाजी सकनुरे, गंगाधर शिंदे, आनंदराव इंगोले, प्रकाश शिंदे, शशिकांत शिंदे, शिवशंकर तिपणे, चंद्रकांत कोंडारे, निळकंठ पाटील, हावगीराव बंडू पाटील, मोगलाजी सोनकांबळे यांच्यासह चारही गावांतील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लवकरात लवकर रस्त्याच्या कामास मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करावे, अन्यथा चारही गावांतील नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## आ. चिखलीकर यांनी लोहा येथे तर प्रणितातार्इ चिखलीकर यांनी कंधार येथे बजावला मतदानाचा हक्क

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २६ जुलै -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जिल्हा स्तवरील जागेसाठी आज रविवार २६ जुलै रोजी मतदान होत आहे. शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी तर प्रणिताताई चिखलीकर यांनी कंधार येथे मतदानाचा हक्क बजवला.



जिल्हा बँकेच्या ११ जागा यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या आहेत. लोहा तालुक्यातुन आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विजयाची हॅट्रिक केली कंधार मधून ते यापूर्वी दोन वेळा बँकेवर निवडून गेले होते .जिल्हा बँकेत त्याची ही पाचवी टर्म आहे. कंधार तालुक्यातुन प्राणिताताई देवरे चिखलीकर या बिनविरोध निवडून आल्या आहेत.

लोहा तालुक्यात सेवा सहकारी सोसायटीचे ८७ मतदार सेवा संस्था मच्छिमार व मजूर सहकारी संस्थेचे ११ पत संस्था व बिगर सोसायटी अंतर्गत १३ मतदार आहेत .तुळजाई मंगल कार्यालयात रविवारी सकाळी अकरा वाजता मतदारांना शेतकरी विकास पॅनेलच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण ,राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस पक्षाने एकत्रित येऊन ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न केले ११ जागा यापूर्वी बिनविरोध निवडणून आल्या आता १२ जागेवर निवडणूक होते आहे ते सर्व आपले उमेदवार निवडून येतील तेव्हा सर्वांची ही एकजूट कायम राहावी व बँकेच्या हितासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले .यावेळी युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, दीपक पाटील नांदेड, नगराध्यक्ष शरद पवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम , सचिन पाटील चिखलीकर, दता वाले छत्रपती धुतमल,माजी सभापती खुशाल पाटील पांगरीकर, माजी जि प सदस्य गणेशराव सावळे, साहेबराव काळे, यासह मतदार प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

## सोन्याची लंका' हे पर्यटनाचा आनंद देणारे पुस्तक :डॉ. सुरेश सावंत

**नांदेड** -'सोन्याची लंका' ह्या पुस्तकात लेखकाने श्रीलंकेतील निसर्गसौंदर्य, पर्यटनस्थळे, लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे यथातथ्य दर्शन घडविले आहे. ह्या पुस्तकाच्या वाचनातून वाचकाला परदेश पर्यटनाचा निखळ आनंद मिळतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी केले. बालरोगतज्ज्ञ डॉ. यशवंत चव्हाण यांनी लिहिलेल्या 'सोन्याची लंका' ह्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. हे पुस्तक लिचब्लिक प्रकाशनाने प्रकाशनासाठी सिद्ध केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमानंद तोष्णीवाल हे होते. यावेळी व्यासपीठावर नगरसेविका सौ. ठाकूर, मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रवीणा मांदळे, माजी आरोग्य अधिकारी डॉ. सविता चव्हाण आणि मुख्याध्यापक माहुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला चिरंजीलाल दागडीया, मुख्याध्यापक माहुरे, राम शेळके, मोहनराव चव्हाण, भारत पाटील तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे या पुस्तकाचे प्रकाशन इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कु. अबोली चव्हाण हिच्या हस्ते करण्यात आले.

## सेवानिवृत शिक्षक शेषेराव सोनकांबळे यांचे निधन



**उमरी**-तालुक्यातील पत्रकार पी.जी. गिलचे यांचे व्हाई सेवानिवृत शिक्षक शेषेराव दशरथ कांबळे ( शिवनखेडकर )( ह.मु रामानंदनगर नांदेड ) यांचे दि २५ जुलै २०२६ रोजी सकाळी ६:३० वाजता ह्रदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले मृत्यु समयी त्यांचे वय ७० वर्ष होते . त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुली , एक मुलगा नातवंड असा मोठा परिवार आहे त्यांचा अंत्यसंस्कार २५ जुलै रोजीच ४:३० वाजता गोवर्धन घाट नांदेड येथे करण्यात आले आहे . पाणी पुरवठा विभागाचे इंजि - मनेष गिलचे व विजय हानमंते यांचे सासरे तर शिक्षक मनोज सोनकांबळे यांचे ते वडिल होत .

## हरित देगलूरच्या दिशेने राष्ट्रवादीचे पाऊल; स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २६ जुलै -**

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा पवार) व महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जनसेवा सप्ताह अंतर्गत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून देगलूर येथील यशवंतराव चव्हाण गृहनिर्माण सोसायटी परिसरात वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.



झाडे लावा... झाडे जगवा हा संदेश देत मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षांचे दीर्घकाळ संवर्धन व्हावे यासाठी प्रत्येक रोपाभोवती लोखंडी संरक्षक जाळीही उभारण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते लक्ष्मीकांत पदमवार यांनी व्यक्त केले. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणासमोरील आव्हाने लक्षात घेता अशा उपक्रमांची गरज अधिक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**शहरात दहा हजार वृक्ष लागवडीचा संकल्प : लक्ष्मीकांत पदमवार**

देगलूर शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि निसर्गरम्य करण्यासाठी टप्प्याटप्प्याने दहा हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते लक्ष्मीकांत पदमवार यांनी केली. विकासाची सुरुवात स्वतःपासून आणि आपल्या परिसरापासूनच व्हायला हवी, या भावनेतून यशवंतराव चव्हाण गृहनिर्माण सोसायटी येथून या अभियानाची सुरुवात करण्यात आली असून, एक व्यक्ती - एक वृक्ष ही संकल्पना राबवत प्रत्येक वृक्षाच्या संगोपनाची जबाबदारीही निश्चित केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**स्व. अजितदादांना आवडणारे समाजोपयोगी उपक्रमच राबवत आहोत : बालाजीर टेकाळे**

नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजीराव टेकाळे म्हणाले, देगलूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आल्यानंतर शहर विकासाला प्राधान्य देत विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्व. अजितदादा पवार यांना स्वच्छता, हरित परिसर, आरोग्य जनजागृती आणि समाजोपयोगी कार्य विशेष प्रिय होते. त्यांच्या विचारांना अभिवादन म्हणूनच जयंतीनिमित्त अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**आदर्श शहर घडविण्यासाठी राष्ट्रवादी कटिबद्ध : देवेंद्र मोतेवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष देवेंद्र मोतेवार यांनी सांगितले की, जनतेने राष्ट्रवादी काँग्रेसवर दाखविलेल्या विश्वासाचे सार्थक करत शहरात स्वच्छता, हरितीकरण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्यात येत आहे. जनसेवा सप्ताहात विविध सामाजिक उपक्रम राबवून देगलूरला आदर्श शहर बनविण्याचा पक्षाचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते लक्ष्मीकांत पदमवार, नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजी टेकाळे, शहराध्यक्ष देवेंद्र मोतेवार, गटनेत्या उज्वलाताई लक्ष्मीकांत पदमवार, नगरसेवक नंदकिशोर शाखावार, नगरसेवक अनिल बोन्लावार, नगरसेवक सुमंत कांबळे, नगरसेवक सय्यद मोय्योदीन, सय्यद सादकभाई , सुमीत कांबळे, गजू कांबळे, शहर उपाध्यक्ष संतोष उनग्रतवार, अल्पसंख्याक शहराध्यक्ष अथर हाशमी, नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक गौरव जाधव व कर्मचारी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सयावेळी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा निर्धार केला आहे. जनसेवा सप्ताहात अशाच विविध समाजोपयोगी उपक्रम इंद्वारे स्वर्गीय अजितदादा पवार यांना अभिवादन करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.